शनिवार, २० जानेवारी २०२४
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - १५५
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) SATURDAY 20 JANUARY 2024 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ●YEAR-03 ●ISSUE-155 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-12 ●PRICE-05

## माझ्या रामाला डोळेभरून पाहू की काळजात ठेवू !

आधुनिक केसरी न्यूज

**अयोध्या :** अयोध्येच्या भव्य राम मंदिरात विराजमान होणाऱ्या रामललाच्या मूर्तीचा फोटो शुक्रवारी समोर आला आहे. या मूर्तीच्या चेहऱ्यावरचे भाव स्पष्ट पाहाता येत आहे. मूर्ती काळ्या पाषाणापासून बनलेली आहे, जी त्याचे भव्य बालस्वरूप दर्शवते. भगवंतांच्या कपाळावर तिलक असून एका हातात धनुष्य व दुसऱ्या हातात बाण आहे. रामललाच्या चेहऱ्यावर हलके हसू आहे आणि त्यांचे डोळे उघडे आहेत.



**सोमवारी महाराष्ट्रात शासकीय सुट्टी :** अयोध्येतील प्रभू श्रीरामांच्या मंदिराचे येत्या सोमवारी लोकार्पण होत आहे . या कार्यक्रमाच्या निमित्ताने देशभरात उत्साहाचे वातावरण आहे . विशेष म्हणजे केंद्र सरकारने या दिवसासाठी अर्ध्या दिवसाची सार्वजनिक सुट्टी जाहीर केली आहे . अयोध्येतील प्रभू श्रीराम मंदिराच्या लोकार्पणाच्या पार्श्वभूमीवर देशभरातील रामभक्तांमध्ये अतिशय उत्साहाचे वातावरण आहे . पंतप्रधान मोदी यांनी अयोध्येतील राम मंदिराचा 22 जानेवारीचा लोकार्पणाचा दिवस हा दिवाळी म्हणून साजरा करण्याचे आवाहन केले आहे . या दिवशी दीपावली साजरी करण्यात यावी, घरोघरी दिवे लावण्यात यावेत, दीपोत्सव साजरा करण्यात यावा, असे आवाहन मोदींनी केले आहे .

## मोदीची गॅरंटी म्हणजे वचनपूर्ती

### राज्यातील ९० हजार घरांचा पंतप्रधानांच्या हस्ते ताबा

आधुनिक केसरी न्यूज

**सोलापूर :** मी जेव्हा या प्रकल्पाचं भूमिपूजन केलं होतं तेव्हाच तुम्हाला गॅरंटी दिली होती की तुमच्या घरांच्या चाव्या देण्यासाठीही मी स्वतः येईन. आज मी माझं वचन पूर्ण केलं आहे आणि याचा मला खूप आनंद आहे. मोदीची गॅरंटी म्हणजे वचनपूर्ती, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले. सोलापूरजवळ कुंभारी येथे माकपचे नेते, माजी आमदार नरसय्या आडम यांच्या प्रमुख पुढाकाराने ३० हजार असंघटित कामगारांना रे नगर योजनेंतर्गत उभारण्यात येणाऱ्या घरांच्या पहिल्या टप्प्यातील १५ हजार घरांसह राज्यातील सुमारे ९० हजार घरांचा ताबा पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते शुक्रवारी समारंभपूर्वक देण्यात आला. त्यावेळी उपस्थित सुमारे एक लाख जनसमुदायासमोर ते बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर राज्यपाल रमेश भैस, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, दुसरे उपमुख्यमंत्री अजित पवार, सोलापूरचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील तसेच खासदार डॉ. जयसिध्देश्वर शिवाचार्य, माढ्याचे खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर, सांगलीचे खासदार संजय पाटील, भाजपचे आमदार विजय देशमुख, सुभाष देशमुख, सचिन कल्याणशेट्टी आदी उपस्थित होते. कामगारांसाठी देशात सर्वात मोठ्या समजल्या जाणाऱ्या या पथदर्शी गृहप्रकल्पाचे मुख्य प्रवर्तक नरसय्या आडम यांनी स्वागत व प्रास्ताविक केले.

मोदी पुढे म्हणाले की, देशाचा सर्वांगीण विकास करताना गोरगरीब जनतेच्या सुखी जीवनाचे स्वप्न पूर्ण होत असल्याबद्दल जनता जनार्दनाकडून मिळणारा आशीर्वाद हेच आपले सर्वात मोठे भांडवल आहे. पूर्वीच्या सरकारकडून केवळ गरिबी हटावाच्या घोषणा व्हायच्या. प्रत्यक्षात गरिबी हटत नव्हती. आपल्या सरकारने केवळ घोषणा न करता ठोस कामातून गरिबी हटवत आहोत, असे उद्गार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काढले. भगवान श्रीरामाने दिलेल्या सत्यवचनाच्या शिकवणीतून हजारो गरीब कामगारांना हक्काची घरे देण्याचा संकल्प साकार होताना त्यातून मिळणारा आनंद जास्त वाटतो, अशा भावनापूर्ण शब्दात मोदी यांनी अयोध्येत होणाऱ्या श्रीराम मंदिराच्या उभारणीचा सूरही आळवला. या शासकीय समारंभात आपल्या ३८ मिनिटांच्या भाषणात पंतप्रधान मोदी यांनी अयोध्येत येत्या २२ जानेवारी रोजी प्राणप्रतिष्ठा होणाऱ्या श्रीरामलल्ला मंदिराचा उल्लेख करून त्यादिवशी सायंकाळी प्रत्येकाने आपापल्या घरात रामज्योत प्रज्वलित करण्याचे आवाहन केले.

## महावितरण अधिकाऱ्यांच्या मेहरबानीने पाच ठिकाणी एकच एजन्सी पैलवान!

### वीज मीटर रिडींग सुधारण्याचे स्वप्न पाहणाऱ्या अधिकाऱ्यांचे दिवा स्वप्नच राहणार?

आधुनिक केसरी न्यूज

**सचिन कोरडे**

**धाराशिव :** महावितरण कडून वीजचोरी,मीटर रिडींग व बील या मधील तफावत तसेच वीजेतील तूट यासर्व बाबी लक्ष्यात घेता महावितरण कडून वीज मीटर रिडींगचे काम हे कामाचा दर्जा उत्तम असणाऱ्या एजन्सीलाच दिले जाते.

वीज मीटर रीडिंगसाठी परंडा, तेर, भुम, वाशी, कळंब येथील वीज मीटर रीडिंगसाठी वेगवेगळया एजन्सीला टेंडर दिलेले होते.

महावितरणने वीज मीटर रिडींग कामाचे टेंडर संपल्यानंतर नवीन टेंडर निविदा काढताना एकाच कंपनीवर गैर रित्या मेहरबान झाल्याचे चर्चा सर्वत्र सुरु आहे. नियमानुसार ज्या एजन्सीची वीज मीटर रिडींग बाबतची कामगिरी चांगल्या दर्जाची आहे. अश्या निविदा भरलेल्या कंत्राटदाराला काम देणे अपेक्षित आहे. कळंब काम करणाऱ्या एजन्सीची वीज मीटर रीडिंग कामगिरी चांगली नसतांना देखील या नियमाला हरताळ फासत जाणीव पूर्वक नियम




धाब्यावर ठेवून तीच एजन्सी पूर्ववत ठेवून वाशी,तेर, भुम,परंडा व कळंब येथे वीज मीटर रीडिंग साठीही हीच एजन्सी कशी नेमण्यात आली हे मात्र नवल आहे. याबाबत संबंधित विभागाच्या कामकाजाचे आश्चर्य व्यक्त होत आहे. कारण जरी वीज मीटर रिडींग साठी एजन्सी बदलली असेल तरी मात्र प्रत्यक्ष रीडिंग घेण्याचे काम बघणारे लोक मात्र तेच आहेत. मग नुसते एजन्सी नावे बदलून वीज मीटर रीडिंग चे काम जर पूर्वीचेच लोक करतं असतील तर वीज चोरी,वीज मीटर रिडींग तफावत कशी थांबणार,वीज मीटर रीडिंग मध्ये सुधारणा कशी होणार? लोकच बदलायचे नाही त, ई-निविदा काढून नुसती एजन्सीची नावे कशाला बदलली जातात हे मात्र कळायला मार्ग नाही. मग इकडं वीज मीटर रिडींग सुधारणा करण्यासाठी जे अधिकारी स्वप्न पाहत आहेत.त्यांच्या स्वप्नावर महावितरणकडूनच विभागांकडून पाणी ओतण्याचे काम सुरू केलं आहे. ह्या अश्या अनेक लाडक्या एजन्सी जिल्ह्यात आहेत. सर्व नियमांना काळे फासत पैश्याचा हव्यासापोटी लबाड एजन्सीचे लाड पुरविणाऱ्या अधिकाऱ्यावर चौकशी करूनच कारवाई व्हावी अशीच नियमित वीज बील भरणाऱ्या ग्राहकांकडून मागणी होत आहे.

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार




किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही
सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118
www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर

अमृतमहोत्सवी कार्यक्रमास खूप शुभेच्छा..!!
खूप खूप आरोग्यदायी शुभेच्छा...!!
जैन कासार समाज संस्थेचे संस्थापक,
विद्यमान केंद्रीय उपाध्यक्ष
जैन कासार समाजाचे प्रेरणास्थान
'दान चिंतामणी' म्हणून सुपरिचित,
जैन कासार समाजाची आभाळमाया,
'जैन कासार समाचार'चे अर्ध्वयू,
श्री. विजयअण्णा कासार
यांना अमृतमहोत्सवी वाढदिवसानिमित्त आरोग्यदायी हार्दिक शुभेच्छा !



श्री. विजयअण्णा कासार
शुभेच्छुक
दिगंबर जैन कासार समाज संस्था (रजि.)
जैन कासार विकास प्रतिष्ठान, सोलापूर




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

## ते चाळीस दिवस. ..

जंगलात कसे राहायचे, आपला बचाव कसा करायचा, काय खायचे आणि काय खायचे नाही याचे ज्ञान तिला लहानपणापासून मिळाले होते. अवघ्या एक वर्षाच्या क्रिस्टीनालाही सांभाळण्याची जबाबदारी तिच्यावर होती. लेस्ली आणि तिची भावंडे नियतीने घेतलेल्या कठोर परीक्षेत यशस्वी झाली. चाळीस दिवस या मुलांनी जीवनमरणाचा लढा दिला होता. कशी राहिली असतील ही मुलं ? त्यांनी काय खाल्लं असेल ? पाण्याची तहान त्यांनी कशी भागावली असेल ? केवळ एका वर्षाच्या बाळाला त्यांनी कसे सांभाळले असेल असे अनेक प्रश्न आपल्याला पडतात. इकडे शोधपथकाचे कार्य सुरूच होतं. स्निफर डॉगसह १५० सैनिक या मुलांचा शोध घेत होते. अखेर त्यांना या मुलांच्या काही खाणाखुणा मिळायला सुरुवात झाली. एक दुधाची बाटली, डायपर, कात्री, केस बांधण्याची क्लिप आणि आणखी काही वस्तू मिळाल्या. मुलांच्या पायांचे ठसे आढळले. शोधपथकाच्या आशा पल्लवित झाल्या. त्यांनी आपल्या तपासाचा वेग वाढवला आणि त्यांच्या प्रयत्नांना यश आलं. चारही मुलं आश्चर्यकारकरित्या त्यांना जिवंत मिळाली. त्यांच्या आनंदाला पारावर राहिला नाही. कोलंबियाचे राष्ट्राध्यक्ष गुस्तावो पेट्रो यांनी ही आनंदवार्ता जाहीर केली. ते म्हणाले, ' इतक्या भीषण परिस्थितीतही ही मुले चाळीस दिवस जिवंत राहिली, हे एखाद्या चमत्कारापेक्षा कमी नाही. ही मुले राष्ट्राचे भूषण आहेत. ' या मुलांना त्यांना चिल्ड्रन ऑफ कोलंबिया म्हणून जाहीर केले. अत्यंत विपरीत परिस्थितीत राहिल्यामुळे ही मुले कमालीची अशक्त आणि आजारी झाली होती. त्यांना पुढील उपचारासाठी कोलंबियाची राजधानी बोगोटा इथे नेण्यात आले. या घटनेला आपल्या मनोवृत्तीप्रमाणे केवळ ' देव तारी त्याला कोण मारी ' असे म्हणून सोडून देता येणार नाही. या घटनेत मुलांची जगण्याची दुर्दम्य इच्छाशक्ती तर आहेच पण विपरीत परिस्थितीतही जीवन जगण्याचं जे ज्ञान आणि कौशल्य त्यांच्याकडे होतं त्यामुळे ती जिवंत राहू शकली.





## आनंदी पहाट

### ध्यानाभ्यास आपल्याला सक्षम करतो

आधुनिक केसरी

ध्यान जसजसे सखोल होत जाते, तसतसे स्वतःचा शोध घेणारा व्यक्तीचा अहंकार नाहीसाहोताना दिसतो, आध्यात्मिक अंतरात्मा सोडून मन स्वतःवर केंद्रित होते, एक प्रकारची आनंदी शांतता, अप्रिय भावना, द्विधा मनस्थिती आणि बडबड यांच्या अवस्थेत मोठे परिवर्तन घडून येते. अंतर्ज्ञानी होण्याचे अनुभव त्यामुळे अधिक येऊ शकतात. अशा क्षणांमध्ये काहीतरी घडते, जेव्हा आध्यात्मिक क्षेत्र लौकिक जगाशी पूर्ण सुसंगतपणे दिसून येते. आध्यात्मिक परिमाणाशी अशा प्रकारे मन नैसर्गिकरित्या जुळून आल्याने, व्यक्तीचा आध्यात्मिक स्व किंवा आत्मा हा विश्वाच्या महान, व्यापक आणि एकात्म आत्मा म्हणजेच परमात्मा, देव किंवा जीवन शक्तीशी थेट संवाद घडवून आणू शकतो. अंतर्दृष्टी अखेरीस एक प्रकारची सार्वत्रिक जोडणी आणि नातेसंबंध निर्माण करते, केवळ निसर्ग आणि संपूर्ण विश्वाशीच नाही, तर इतर सर्वांशी देखील तसे नाते प्रस्थापित होते. एखाद्याचे मन सक्षम असणे आणि स्वतःच्या भावनिक स्थितीमुळे ते विचलित होणे हे सर्वकाही टाळणे त्यामुळे शक्य होऊ शकते. ध्यानाचा सराव यास मदत करतो. एखाद्या व्यक्तीकडून आंतरिक भावना म्हणून थेट सहानुभूतीपूर्ण संप्रेषणामुळे प्राप्त होणाऱ्या अधिक सूक्ष्म संवेदनांना तुम्ही एकाग्रता देऊ शकता. इतर अध्यात्मिक कौशल्ये अशा लोकांच्या कल्याणाशी संबंधित आहेत, जे त्यांच्या व्यवसायाच्या मागणीनुसार किंवा त्यांच्या जीवनाच्या सामान्य वाटचालीत, ज्यांना त्रास होत आहे त्यांच्याशी संलग्न आहेत. ध्यानाचा अभ्यास प्रत्येकासाठी नाही, काही लोक ते अनुत्पादक किंवा कंटाळवाणे म्हणून अनुभवतात किंवा त्यांच्या संभाव्य परिणामकारकतेवर शंका घेऊन सरावापासून परावृत्त होतात. इतरांना शांत राहण्यासाठी, एकाग्रतेसाठी खूप अस्वस्थ किंवा विचलित वाटते. काहींना आध्यात्मिक पद्धतींमध्ये व्यस्त राहून फायदा होतो. इतरांना मदत करण्याच्या आपल्या क्षमतेमध्ये आपल्या स्वतःच्या, एकमेकांच्या कल्याणाला पुरेसे प्राधान्य दिले जाते.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

### परमार्थ करावा | हळुवार ||

टाळाचिया संगे | बोले मन माझे ||
संसाराचे ओझे | दूर झाले ||१||
थाटला संसार | अभंगाच्या दारी ||
आता तूचि तारी | पांडुरंगा ||२||
नामाचा गजर | पडताच कानी ||
बोले संतवाणी | काळजात ||३||
कर्माच्या संगती | जगण्याचे हीत ||
सूरमयी गीत | प्रारब्धाचे ||४||
पा-पुण्य सार | भावार्थी जाणावा ||
परमार्थ करावा | हळुवार ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८


## निरुपण

आधुनिक केसरी

ऐकोनि मेळले लोक ।उभे पाहाती कौतुक ।
म्हणती बापास लेक ।कामा आले ॥२०॥
ज्या कारणें केले नवस ।ज्या कारणें केले सायास ।
ते पुत्र पितीयास ।मारिती पहा ॥२१॥
ऐसी आली पापकळी ।आश्चिर्य मानिलें सकळीं ।
उभे तोडिती कळी ।नगरलोक ॥२२॥

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

राग द्वैष कोइ से नहीं, समदर्शी संसार ।
परहित सहज स्वभाव है, शुद्ध व सरल विचार ।।०९।।(स्वर्वेद चतुर्थ मण्डल नवम अध्याय) ०४/०९/०९
मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
संतजन शुद्ध , सरळ विचार तसेच स्वाभाविक सहजपणे दुसऱ्यांवर उपकार करणारे असतात. कोणाचाही राग-द्वेष न धरता जगात समदर्शी होऊन राहातात. संतांची राग-द्वेष रहित सर्वांसाठी हितकारक समान दृष्टी असते.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

.......................................................................

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## निसंदेहनिरूपण

आधुनिक केसरी




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

पण अभोक्ता व अकर्ता हे दोन्ही एकाच वेळी असु शकणार नाही. याचे उत्तर असे आहे की ज्ञानी पुरूष बाहेरून सामान्य माणसासारखा दिसतो,पण त्याची आतील अवस्था अगदीच निराळी असते. अहो यालाच परमात्मस्वरूपाशी एकरूप होणे असे म्हणतात प्रत्येक जीवात भगवंत असतो ही तीचं अवस्था होय. भगवंताची जी अंतस्थिती ही तशीच असल्याने व त्याने ज्ञान संपादन करून परमात्मस्वरूपाशी एकरूप झाल्याने तो मनुष्य वेश धारण करणारा परमात्माचं आहे. कारण परमात्म्याला असलेले सगळे गुण त्यांच्याकडे आलेले आहेत. मित्रांनो आता लक्षात आले असेल की तो करून अकर्ता व भोगून अभोक्ता कसा राहू शकतो. आता हे समजण्यासाठी तरी आपली भक्ती व श्रध्दा भगवंताच्या पायाशी एकरूप झाली पाहिजे. म्हणून म्हणते की, देवरूप होऊ सगळे.

## संतांचे ग्रंथ

आधुनिक केसरी

संतांचे ज्ञानच असे असते की, त्यांना वेदांताचे मर्म आपोआप कळते. अमुक एक ग्रंथ कुणी लिहिला, केव्हा लिहिला, त्यामध्ये अमक्या पानावर काय आहे, या गोष्टी एक वेळ संतांना सांगता येणार नाहीत, पण त्या विषयाचे मर्म त्यांना बरोबर ठाऊक असते. आपण पोथीतले नुसते शब्द तेवढे वाचतो; त्यांचा अर्थ संतांच्या कृपेवाचून कळणे कठीण आहे. बापाचा निरोप लहान मूल आईला आपल्या बोबड्या शब्दांत आणि स्वतःला कळला असेल तसा सांगत असते, तितपतच पोथीतल्या शब्दांचा अर्थ आज आपल्याला सांगता येईल. संतांनी ग्रंथ लिहिले याचे कारण, ज्यांना बुद्धीने खात्री करून घ्यायची आहे त्यांनी ती करून घ्यावी आणि परमार्थ करावा. संतांच्या वचनाचा ओढूनताणून अर्थ करू नये, त्याचा सरळ अर्थ घ्यावा. ग्रंथ वाचीत असताना आपली मते बाजूला ठेवावीत; एका अक्षरावर दुसरे अक्षर लिहिले, तर पहिले दिसत नाही आणि समजत नाही, म्हणून शुद्ध मनाने ग्रंथ वाचावा. आपल्या वडिलांचे पत्र जर आपल्याला आले



तर आपण त्यातले अक्षर अन् अक्षर वाचतो. तसे, ज्ञानेश्वरी, दासबोध हे ग्रंथ अगदी मनापासून वाचावेत. पुष्कळ लोक जे पोथी ऐकायला जातात ते लोकांनी बरे म्हणावे यासाठी, किंवा करमत नाही यासाठी, किंवा इतर उद्योग नाही म्हणून जातात. असे करणे योग्य नाही. खरे म्हणजे, संतांचे ग्रंथ वाचून स्वतःला काय करायला पाहिजे ते शोधून काढून तेवढे करणारे लोक थोडेच असतात. ते ग्रंथ वाचून त्यांचा अर्थ नीट समजणारे लोक त्यापेक्षा जास्त असतात; 'मोठ्या संताचा ग्रंथ आहे' म्हणून नुसता वाचणारे लोक त्याहून जास्त असतात; आणि त्याहीपेक्षा, ते ग्रंथ मुळीच न वाचणारे लोक फारच जास्त असतात ! जगाच्या प्रवाहाच्या उलट जायला संतांजवळ शिकायचे असते. संतांना व्यवहारापुरतीच देहाची स्मृती असते. ते देहाला सावलीप्रमाणे मानतात. सावलीला दुःख झाले म्हणणे केव्हाही अयोग्यच. म्हणूनच संतांच्या मनावर सुखदुःखाचा परिणाम होत नाही. संतांकडे लोक कितीतरी कष्ट करतात आणि ते लोक यांच्या नात्यागोत्याचेही नसतात. संत त्यांना काही देत नसताना ते इतके कष्ट करतात, याचे कारण संतांचा त्यांच्याविषयी असणारा खरा आपलेपणा होय. संत एकांतात जातात याचे कारण असे की, लोकांतात त्यांना भेटणारे निराळे असतात आणि एकांतात भेटणारे निराळे असतात. लोकांतात संतांची शांती बिघडते असे मुळीच नाही; पण एकांतात भेटणाऱ्यांना लोकांतात भेटता येत नाही, म्हणून ते एकांतात जातात.

## गहिनीनाथ

आधुनिक केसरी

त्याने चरणांवर मस्तक ठेविले व मी सर्व व्यवस्था लावून बंदोबस्त करितो, आपण काही काळजी न करितां स्वस्थ असावे असे सांगितले. नंतर त्याने अष्टसिद्धींस बोलावून त्यांच्याकडे स्वयंपाकाचे काम देऊन उंची उंची अनेक पक्वान्ने तयार करण्याची आज्ञा केली व बंदोवस्त नीट राहून काही एक न्यून न पडू देण्याची सक्त ताकीद दिली. मग त्याने एकंदर कामाची व्यवस्था लाविली व उत्सवाचा बंदोवस्त उत्तम प्रकारचा ठेविला. त्या वेळेस सर्वांना अत्यानंद झाला. या भोजनसमारंभांत गहिनीनाथ आले नव्हते. म्हणून गोरक्षनाथानें ही गोष्ट मच्छिंद्रनाथास सुचविली. तेव्हा मधुब्राह्मणाकडे एका गंधर्वास पाठवून पुत्रासह त्यास घेऊन येण्यास सांग, म्हणजे तो त्यास आणील, असे मच्छिंद्रनाथाने गोरक्षास सांगितले. त्यावरून गोरक्षनाथाने चित्रसेनगंधर्वास सर्व वृत्तान्त कळविला व त्याच्या अनुमतीने एक पत्र लिहविले. ते त्यानेंसुरोचन नामक गंधर्वाजवळ दिले. ते त्याने कनकगिरीस जाऊन त्या मधुब्राह्मणास दिले.

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
शनिवार, २० जानेवारी २०२४
adhunikkesari.com Adhunik Kesari



# वक्तृत्व स्पर्धा ही भविष्यातील नेतृत्व घडवण्याची सुवर्णसंधी असते

## वसंत मुंडे : बलभीम महाविद्यालयात मराठी विभाग आयोजित राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज

**बीड :** ईश्वराने बोलण्याचा गुण फक्त मानवालाच दिला आहे. जगात जी परिवर्तने झाली ती बोलणाऱ्या लोकांनीच केली तसेच जो अधिक चांगला बोलतो तो यशस्वी होतो. चांगल्या वक्तृत्वासाठी वाचन व निरीक्षण आवश्यक आहे तसेच चांगली पुस्तके वाचणे व चांगली भाषणे ऐकणे गरजेचे असून तुमच्या शब्दांमध्ये ताकद असायला हवी. अशा स्पर्धा या भविष्यातील यशस्वी नेतृत्व घडविण्यासाठी महत्वाच्या असतात असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष मा. वसंत मुंडे यांनी केले. बीड येथील बलभीम कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात पदवी व पदव्युत्तर मराठी विभाग आणि संशोधन केंद्राच्या वतीने दि. १८ जानेवारी रोजी बलभीम महाविद्यालय राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेच्या उदघाटन समारंभात ते उदघाटक म्हणून बोलत होते. या उदघाटन समारंभाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.संतोष उंदरे होते तर मंचावर उपप्राचार्य डॉ. बाबासाहेब कोकाटे, प्रा. विजय गुंड, प्रबंधक पी.पी. डावकर, स्पर्धेचे परीक्षक डॉ. एम.ए.कव्हळे, श्री. दादासाहेब मुंडे, श्री. ज्ञानदेव काशिद, मराठी विभागप्रमुख डॉ. मनोहर सिरसाट यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना वसंत मुंडे म्हणाले की, विद्यार्थ्यांनी काळासोबत चालले पाहिजे. आज तंत्रज्ञान आवश्यक आहे परंतु तंत्रज्ञानाचा अतिरेक करता कामा नये. विद्यार्थ्यांना आपल्या क्षमता ओळखता आल्या पाहिजेत तसेच संवाद कला आत्मसात करणे आवश्यक आहे. या समारंभाच्या अध्यक्षीय मार्गदर्शनात प्राचार्य डॉ. संतोष उंदरे म्हणाले की, बलभीम महाविद्यालयाला वक्तृत्वाची मोठी परंपरा असून या महाविद्यालयातून अनेक नामवंत वक्ते घडले आहेत. याच परंपरेला पुढे घेऊन जाण्यासाठी तसेच विद्यार्थ्यांमध्येही असलेल्या क्षमतांना संधी मिळावी या उद्देशाने महाविद्यालयात राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा आयोजित केली असल्याचे सांगितले.यापुढे प्रत्येक वर्षी या स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार असून यातून भविष्यात यशस्वी वक्ते घडावेत हा मानस महाविद्यालयाचा असल्याचे त्यांनी सांगितले. तत्पूर्वी मराठी विभागप्रमुख प्रोफेसर डॉ. मनोहर सिरसाट यांनी प्रास्ताविकातून राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा आयोजनामागील भूमिका मांडताना सांगितले की, वक्तृत्व ही कला आहे,शास्त्र आहे,कौशल्य आहे आणि ती एक साधनाही आहे.दहा हजारांमधून एक वक्ता तयार होत असतो.अशा वक्त्यांचा शोध घेण्यासाठी अशा स्पर्धा आवश्यक असतात. महाविद्यालयाला वक्तृत्वाची समृद्ध परंपरा असून ही परंपरा पुढे घेऊन जाण्यासाठी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. या उदघाटन समारंभाचे सूत्रसंचालन प्रा. संदीप परदेशी यांनी केले तर आभारप्रदर्शन डॉ. रेखा ढेरे यांनी केले. या उदघाटन समारंभास डॉ.अनिल चिंधे, डॉ.राजेंद्र चव्हाण,प्रा.महारूद्र जगताप, डॉ. सुनिता बोराडे, प्रा. व्यंकटेश राऊत, डॉ.रवींद्र काळे यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विविध महाविद्यालयातील स्पर्धेक व विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# धुळे शहरात सहा मुमुक्षु दिक्षार्थी घेणार जैन भगवती दीक्षा!

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** जैन धर्मीयांमध्ये अत्यंत कठीण मानला जाणारा महोत्सव, संसारापासून कोसो दूर जाऊन दीक्षा घेणे खूप महान असे कार्य धुळे शहरात जैन भगवती दीक्षा घेणाऱ्या सहा मुमुक्षु दिक्षार्थी बुधवार दि.२४ जानेवारी २०२४ रोजी सकाळी ७:०० वाजता खानदेश गोशाळा, दसेरा मैदान, मालेगाव रोड येथे जैनाचार्य रत्नसुंदरसुरीश्वरजी म.सा. यांच्या सानिध्यात दीक्षा ग्रहण करणार आहेत. यानिमित्त दिनांक २३ जानेवारी २०२४ रोजी शितलनाथ जैन मंदिर, ग.नं.२, धुळे येथून शोभायात्रा काढण्यात येणार आहे.

जैन धर्मातील दीक्षा जीवन अत्यंत खडतर जीवन आहे, जैन साधू संपूर्ण आयुष्यभर पाच महाव्रतांचे पालन करतात. यामध्ये आजीवन ब्रह्मचर्याचे पालन, सूर्यास्त नंतर अन्नाचे कणही घेत नाही, भिक्षा ग्रहण करून आपले जीवन प्रयाण करणारे साधू-साध्वी जीवनभर पायी प्रवास करतात. तसेच धन-दौलत, कुटुंब सर्व त्याग करून जैन दीक्षा ग्रहण केली जाते. असे सर्व सुख सुविधांचे जीवन त्याग करून जैनाचार्य रत्नसुंदरसूरीश्वरजी म.सा. यांच्या सानिध्यात सहा मुमुक्षु आत्मा दीक्षा ग्रहण करणार आहेत. यामध्ये मुमुक्षु करणभाई आणि तान्याबेन यांचा जन्म अमेरिका येथे झाला आणि बारा वर्षानंतर भारतामध्ये गुरुदेवांच्या संपर्कात आले. गुरुदेवांच्या प्रेरणेने तरुण वयात दीक्षा जीवन स्वीकारत आहेत. त्यांच्यासह मुमुक्षु वितरागभाई (मलकापूर) मुमुक्षु साक्षीबेन (बडोदा) मुमुक्षु नेहाबेन (जयपुर) मुमुक्षु जीनांशीबेन (नागपूर) हे दीक्षा ग्रहण करणार आहेत. सदर दीक्षा महोत्सव निमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन शितलनाथ जैन संस्थान धुळे यांनी केले आहे. दरम्यान २३ जानेवारी रोजी सकाळी ९:०० वाजता शितलनाथ जैन मंदिर ग.नं.२, धुळे येथून शोभायात्रा निघेल. तर रात्री ८:०० वाजता अभिनंदन समारोह खान्देश गोशाळा, दसेरा मैदान, मालेगाव रोड येथे होणार आहे. तसेच दि २४ जानेवारी रोजी दीक्षा ग्रहानाचा कार्यक्रम सकाळी ७:०० वाजता खानदेश गोशाळा, दसेरा मैदान, मालेगाव येथे होणार आहे. दीक्षा महोत्सव निमित्त धुळे शहरात जैनाचार्य रत्नसुंदरसुरीश्वरजी म.सा. सह आदी संत तथा साध्वीजी विराजित आहेत.

शहरात होणाऱ्या मुमुक्षु दीक्षार्थींचा या कार्यक्रम प्रसंगी सकल जैन समाजाने मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन शितलनाथ जैन संस्थान, धुळे तथा सकल जैन संघ यांनी केले आहे.




# राष्ट्रीय चर्मकार महासंघ राष्ट्रीय प्रवक्तेपदी डॉ. बच्छिरे

आधुनिक केसरी न्यूज

**यासीन शेख**

**लोणार :** राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या राष्ट्रीय प्रवक्ते पदी डॉ. गोपाल बशिरे (बच्छिरे) यांची निवड राष्ट्रीय कार्यकारणी कडून करण्यात आली.

नाशिक येथे झालेल्या राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीची बैठक राष्ट्रीय अध्यक्ष तथा माजी सामाजिक न्याय मंत्री मा. बबनराव घोलप यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली व या बैठकीत संपूर्ण भारतातील पदाधिकारी उपस्थित होते, त्यांच्याकडून राष्ट्रीय कार्यकारणीची फेरनिवड करण्यात आली राष्ट्रीय अधक्षांनी डॉ. गोपाल बशिरे (बच्छिरे) यांची राष्ट्रीय प्रमुख प्रवक्ते पदी निवड करण्याची सूचना मांडली व सर्व पदाधिकारी यांनी एकमुखाने अनुमोदन दिले. याप्रसंगी राष्ट्रीय अध्यक्ष बबनराव घोलप यांच्यासह राष्ट्रीय कार्यकारिणीचे महासचिव डॉ. सोहनपाल सुमनाक्षर दिल्ली, मा.भानुदास विसावे, मा पंढरीनाथ पवार, मा. ज्ञानेश्वर कांबळे, मा दत्तात्रय गोतीसे, सौ नैना घोलप, मा. आमदार भाऊसाहेब कांबळे, मा. आमदार रमेश बुंदिले, मा. अशोकराव माने, डॉ. विठ्ठलराव दांडगे, मा. अशोक विजयकर, मा. आमदार पुरुषोत्तम राजगुरू, मा कृष्णदेव शिंदे, मा. आमदार योगेश घोलप, यांची प्रमुख उपस्थिती होती, डॉ. गोपाल बशिरे यांच्या निवडीबद्दल सर्व समाजाच्या मान्यवरांच्या वतीने त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षा होत आहे.





# पवारांचे प्रत्युत्तुर

आधुनिक केसरी

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते शरद पवार यांनी शुक्रवारी पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या शिर्डीतल्या टीकेला जोरदार प्रत्युत्तर दिलं. आज पंतप्रधान नरेंद्र मोदी हे माझ्यावरच टीका करतील हे मला ठाऊक आहे. परवा शिर्डीतही त्यांनी तेच केले असे शरद पवार म्हणाले. त्याचप्रमाणे इतिहासात काहीजण जसे संताजी धनाजींना घाबरायचे तसे आत्ताचे राज्यकर्ते आम्हाला घाबरत आहेत, असाही टोला आपल्या भाषणात लगावला. आज महाराष्ट्र साखर देशातला उसाची निर्मिती करणारा साखर निर्मिती करणारे क्रमांक दोनचे राज्य आहे. साखर निर्यात करुन दोन पैसे शेतकऱ्यांना मिळत होते मात्र त्यावर बंधने घालण्यात आली आहेत. आजच्या राज्यकर्त्यांना कष्ट करणाऱ्या शेतकऱ्यांविषयीची आस्था नाही. मी जेव्हा सरकारशी चर्चा करायला जातो तर मला सांगितले जाते तुम्ही जो पिकवतो त्याचा विचार करता आम्ही खाणाऱ्याचाही विचार करतो. मी म्हटलं खाणाऱ्याचा विचार केला पाहिजे पण पिकवणाऱ्याचा विचार केला नाही त्याला जर उपाशी मारलं तर तो काय पिकवणार? त्यामुळे मी त्यांना सांगतो पिकवणाऱ्याचा विचार आधी केला पाहिजे. तुम्ही तो विचार करत नाही तोपर्यंत तुमच्या धोरणाला आम्ही पाठिंबा देणार नाही असे मी सरकारला सांगितले आहे असे शरद पवार यांनी म्हटलं आहे. मी एक पुस्तक वाचत होतो. चंद्रकांत पाटील हे भाजपाचे आहेत त्यांनी लिहिलेलं पुस्तक आहे. त्यांनी लिहिलं आहे मोदी सरकारने महाराष्ट्रातल्या १०० साखर कारखान्यांवर एक्साईज ड्युटी होती ती माफ केली. शरद पवारांना हा निकाल देता आला नाही. बरोबर आहे, कारण माझ्यापुढे प्रश्न होता की लहान शेतकऱ्याच्या डोक्यावरचं कर्ज कमी करायचं की या कारखान्यांवरची एक्साईज ड्युटी. साखर कारखानदारी महत्त्वाची आहे. त्यांचे प्रश्न सोडवले पाहिजे. पण १०० कारखान्यांची ड्युटी माफ करणं महत्त्वाचं आहे की देशातला थकबाकीदार असलेला शेतकरी आहे त्याच्या डोक्यावरचं कर्ज माफ करणे आम्हाला महत्त्वाचे वाटले. आम्ही देशातल्या शेतकऱ्यांच्या डोक्यावरचे कर्ज माफ केले. बळीराजा जगला पाहिजे. त्याला कर्जमुक्त केले पाहिजे हेच आम्हाला महत्त्वाचे वाटले, असेही शरद पवार यांनी म्हटले आहे. आम्ही शेतकऱ्यांना ७१ हजार कोटींचे कर्ज आमच्या काळात माफ केलं. आज शेतकरी पुन्हा कर्जबाजारी झाले आहेत. आम्ही ज्या गोष्टी शेतकऱ्यांसाठी केल्या त्या हे सरकार मुळीच करत नाही म्हणून हे सगळे झाले आहे. आज मोदी सोलापुरात आहेत. तुम्ही त्यांचे भाषण ऐका. १०० टक्के मी सांगतो की ते माझ्यावर टीका करणार. परवा शिर्डीला गेले तेव्हा मंदिरात दर्शन घेतले आणि भाषणात म्हणाले शरद पवारांनी देशासाठी काय केले? तुम्ही साईबाबांचे दर्शन घ्यायला आला आहात तर त्या घ्या उगाच चुकीच्या गोष्टी कशाला बोलता असा प्रश्न शरद पवार यांनी विचारला. इतकंच नाही तर इतिहासात आपण वाचले आहे की काही लोकांना छत्रपती शिवरायांच्यानंतर संताजी आणि धनाजी पाण्यात दिसत असत. आज तशाच प्रकारची चिंता आमच्याबद्दल वाटते त्यामुळेच अशी विधानं आमच्याबद्दल ते करतात, असा टोला शरद पवार यांनी लगावला आहे.

# जैन कासार समाजावर आभाळमाया ठेवणारे विजयअण्णा कासार

आधुनिक केसरी

**जैन कासार समाज संस्थेचा विस्तार आज बऱ्यापैकी झालेला आहे. महाराष्ट्रातील सर्वच भागात या संघटनेचे नाव पोहोचले आहे.. पण कोणतीही संस्था उभी राहते ते काही बोटावर मोजण्यासारख्या सर्वस्व पणाला लावून कार्य करणाऱ्या व्यक्तींच्या बळावर. या संस्थेच्या उभारणीतच नव्हे तर असं काही तरी संघटन करावं, ही संस्था उभी करावी याची कल्पना मनात धरून ती प्रत्यक्ष उतरवण्यात आणि आज त्या संस्थेचा आज झालेला वटवृक्ष पाहण्यात एक वेगळाच आनंद असतो. अशी स्वप्न मनात बाळगून ती प्रत्यक्षात उतरवणारे व्यक्तीमत्त्व म्हणजे सध्या पुणे येथे स्थायिक झालेले व सो.क्ष. दिगंबर जैन कासार समाज संस्थेचे केंद्रीय उपाध्यक्ष विजयअण्णा कासार.**

जसे एक बीज जमिनीमध्ये पेरल्यानंतर जसे हजारोंच्या पटीत तो देतो तद्वत्च अण्णांनी ही संस्था उभी राहण्यासाठी बिजाची भूमिका स्वीकारली आहे आणि काही सहकाऱ्यांनी हे संस्थारोपी रोपटे जिवापाड जपले आहे, उभे केले आहे.

जैनत्वाचे संस्कार व वसतिगृहात राहून शिक्षण कर्नाटक राज्यातील बेनाडी येथे जन्मलेल्या विजय अण्णा कासार यांचे शिक्षण सांगली, कोल्हापूर येथे झाले. दिगंबर जैन वसतिगृहात राहून व भारत जैन सभेकडून काही प्रमाणात मिळालेल्या शिष्यवृत्तीमुळे ते शिक्षित झाले. इंजिनिअरिंग डिप्लोमा होताना ते महाराष्ट्रातून तिसरे आलेले आहेत. जैन बोर्डिंगमध्ये राहिल्यामुळे त्यांच्या मनावर तेथे समाजऋणाचे संस्कार झाले. पुढे पदवीचे शिक्षण सुरू असतानाच अचानक वडिलांना नोकरी सोडावी लागली. त्यामुळे घराची जबाबदारी असल्यामुळे त्यांना नोकरी करणे अपरिहार्य झाले. त्यामुळे त्यांनी उच्च शिक्षणापेक्षा नोकरी पत्करली.

तीन भाऊ, दोन बहिणी, आई-वडील असे कुटुंब.. सर्व भावडांच्या शिक्षणाची जबाबदारी माझ्यावर असल्यामुळे त्यांनी नोकरीला प्राधान्य दिले. सर्वांचे शिक्षण होऊन ते आज स्थिरस्थावर आहेत.

जवळपास सात वर्षे त्यांनी मर्फी, बॉश, फिलिप्स आदी कंपनीमध्ये वालचंदनगर, ठाणे, पुणे या ठिकाणी नोकरी केली. कंपनीच्या मालकांनी अत्यंत विश्वासाने राजस्थान, गुजरात आदी ठिकाणी विस्तार केला होता. चीफ इंजिनिअर म्हणून जबाबदारी असताना माझ्या हाताखाली अनेक टॉपचे विद्यार्थी, आयआयटीचे विद्यार्थी काम करीत असत. आपल्या ज्ञानावर कंपनी एवढे कमवत असेल तर आपण आपल्या ज्ञानाच्या उपयोग आता स्वतःसाठी केला पाहिजे असे मन म्हणत होते. माझ्या मनात आता आपण स्वतःची फॅक्टरी काढावी असा विचार घोळू लागला. पण आर्थिक स्थिती अत्यंत बेताची होती. तेव्हा पगार चांगला होता पण घराची जबाबदारी असल्यामुळे आवश्यक तेवढे पैसेसुद्धा शिल्लक ठेवता आले नव्हते. सर्व भावंडांना शिक्षित करणे महत्त्वाचे होते. सात वर्षे नोकरी केल्यानंतर आपल्या ज्ञानाचा उपयोग स्वतःसाठी करावा असे ठरवून ठाणे या ठिकाणी १०० फूटाच्या जागेत आत्मविश्वासाने स्वतःची फॅक्टरी सुरू केली. कष्ट व आत्मविश्वासाच्या बळावर व प्रामाणिकपणे काम करीत असल्यामुळे व्यवसाय वाढत वाढत बारा हजारा स्क्वेअर फुटाच्या जागेत फॅक्टरी उभी राहिली. अल्पावधीत प्रगती केल्यामुळे अनेक पेटंट मिळविली. संशोधनही केले. रेफरीजरेशन उद्योगात नवनवीन पेटंट मिळविली. त्यामुळे अनेक नामवंत संस्थेत मार्गदर्शन करण्याची संधी मिळाली. आयआयटी मुंबई, सीआयआय नवी दिल्ली या ठिकाणी विशेष लेक्चरर देण्यासाठी निमंत्रण मिळाले.

नवनवे संशोधन केल्यामुळे व पेटंट मिळविल्यामुळे तसेच अनेक ठिकाणी मार्गदर्शन केल्यानंतर संगणक क्रांतीचे जनक सॅम पित्रोदा यांच्या हस्ते त्यांचा



विशेष सन्मान झाला. सरकारनेही त्यांचा गौरव केला. अनेक पुरस्कारही मिळाले. जैन समाजाचे संस्कार, आई-वडिलांचे मार्गदर्शन, अपार घेतलेले कष्ट व स्वतःच्या प्रयत्नावर विश्वास यामुळे उद्योग क्षेत्रात प्रचंड यश मिळविले.

ज्या व्यक्तींना कुठे थांबायचे हे कळते त्यांना निश्चितच आयुष्य आनंदात जगता येतं म्हणतात. तसंच आण्णांनीही केलं. त्यांनी वयाच्या ६० व्या वर्षीच व्यवसायातून निवृत्ती घेण्याचे ठरवले. पुढे काही वर्षे संशोधनाचे कार्य करीत काही पेटंट मिळविले. दोन्ही मुले आयटी क्षेत्रात असल्यामुळे या कंपनीत सहभागी होण्याचा प्रश्नच नव्हता. फॅक्टरी फॉर्मात असतानाच त्यांनी कंपनीची विक्री करून यापुढे समाज कार्यासाठी व स्वआनंदासाठी कार्य करण्याचे अण्णांनी ठरविले.

समाजकार्याचा ध्यास सतत वाचन व मार्गदर्शन करीत असल्यामुळे शिक्षणाचं, वाचनाचं महत्त्व अण्णांना होतं. खरं दान हे ज्ञानदान आहे. समाजामधील आर्थिक थर हे ज्ञानातील फरकामुळे आहेत. आपण आयुष्याची किंमत सत्ता, पैसा, प्रतिष्ठा या मापाने मोजावी का? ज्या कामाचे कौतुक, उदोउदो होत नाही ज्यामुळे नाव, किर्ती मिळत नाही ते काम निरर्थक असते का? असा नेहमी प्रश्न पडत असे. प्रत्येक व्यक्ती महान किंवा उत्तुंग कार्य करू शकत नाही. पण आपल्या कुवतीनुसार आपण छान वागावं, कोणालातरी मदतीचा हात द्यावा. याचे फार मोठे लौकिक परिणाम दिसणार नाहीत पण या कृतीचे पडसाद कोणाच्या तरी स्मृतीत कायमचे राहतात हेच खूप आहे. हाच विचार करून अण्णांनी आपल्या कुवतीनुसार आपण छान वागावे आणि काही समाजऋण समजून आपल्याच जैन कासार समाजासाठी काम करण्यास सुरुवात केली. संघटनेच्या माध्यमातून समाजातील शेवटच्या बांधवांपर्यंत कसे पोहोचता येईल हा विचार अस्वस्थ करीत होता. सतत मनात घोळत असल्यामुळे अनेकांशी सतत सुसंवाद करीत असे. यासंदर्भात सांगलीचे पोपटलाल डोर्ले यांच्याशी सतत बोलत असे. यासंदर्भात सविस्तर सांगताना विजयअण्णा म्हणाले, जैन कासार समाज संघटनविषयी पोपटलाल डोर्ले यांच्याशी चर्चा झाल्यानंतर पहिले कार्य कोणते करायचे तर मासिक सुरू करण्याचा विचार मी त्यांच्यासमोर मांडला. त्याद्वारे समाजापर्यंत पोहोच असे ठरले आणि डोर्ले यांच्या साथीने कार्यास प्रारंभ करण्याचे ठरले. यातील अडचणीविषयीही चर्चा झाली. मोठी अडचण म्हणजे मासिक चालवणे मोठे खर्चिक काम होते. आर्थिक अडचणीमुळे मासिक बंद पडणार नाही व मासिकाच्या प्रारंभीच्या खर्चाची व मासिक बंद न पडण्याची जबाबदारी मी घेतल्यामुळे डोर्ले यांनी या कार्यास त्वरित प्रारंभ करून जैन कासार समाज संस्थेच्या कार्यास मोठी गती दिली आणि कार्यकर्त्यांचा एक सक्रीय संघ उभा झाला. महाराष्ट्र, कनार्टक भागात कार्य करीत असलेल्या अनेक जैन समाज बांधवांचे या माध्यमातून स्नेहाचा संबंध जुळले ही व्यक्तीशः माझ्यासाठी मोठी उपलब्धी आहे. आज उभे राहिलेले जैन कासार समाज संस्थेचे काम आपण सर्वजण जाणताच, असेही ते म्हणाले.

'दान चिंतामणी' म्हणून परिचित अण्णांनी यापूर्वीही जैन संघटनांना भरपूर आर्थिक मदत केलेली आहे. पण त्यांचा कल हा समाजाचा कोणताही विद्यार्थी हा आर्थिक अडचणीमुळे थांबू नये यासाठी, उच्च शिक्षणापासून वंचित राहू नये यासाठी होता. त्यांनी दक्षिण भारत जैन सभेच्या शैक्षणिक फंडास भरीव मदत केलेली आहे. 'जैन कासार समाचार' स्वयंपूर्ण व्हावे, त्यासाठीसुद्धा कायमस्वरूपी फंड निर्माण करावा हे ध्येय घेऊन त्यांनी यासाठीसुद्धा मोठी रक्कम संस्थेला देणगी दिलेली आहे आणि गेल्या नऊ वर्षापासून हे मासिक अखंडपणे प्रकाशित होत आहे त्याचे आर्थिक गणितही त्यांनीच सांभाळले आहे, हे येथे विशेष उल्लेख करून नमूद करावे वाटते. एवढेच नव्हे तर कोरोना व महापूर आलेल्या परिस्थतीच्या कठीण काळात कोकण, पश्चिम महाराष्ट्र आदी भागातातील जैन कासार समाज बांधवांना आर्थिक व साहित्याच्या माध्यमातून वेळोवेळी मदत केलेली आहे. तसेच जैन कासार समाज संस्थेच्या (एक कोटी संकल्प) शैक्षणिक फंडातही वेळोवेळी मोठी भर घातली आहे.

अण्णाविषयी बोलताना कवी दत्ता हलसगीकर यांची कविता आठवते. ते आपल्या कवितेत म्हणतात,

**ज्यांची बाग फुलून आली, त्यांनी दोन फुले द्यावीत.. ज्यांचे सूर जुळून आले, त्यांनी दोन गाणी द्यावीत...**
**सूर्यकुलाशी ज्यांचे नाते त्यांनी थोडा उजेड द्यावा.. युगायुगांचा अंधार जेथे, पहाटेचा गाव न्यावा.... आभाळाएवढी ज्यांची उंची, त्यांनी थोडेसे खाली यावे.. मातीत ज्यांचे जन्म मळले, त्यांना उचलून वरती घ्यावे...**

महावीर मोतीचंद दुरुगकर
उपाध्यक्ष- दिगंबर जैन कासार समाज संस्था (रजि.)

# मनुष्य आपल्या कर्माने इतरांना व स्वतःला हानी पोहचवतो



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**मनुष्याच आचरण सुधारण्यासाठी मानवी जन्म प्राप्त झालेला असतो.पण दुर्दैवाने मानवी जन्म मिळून देखिल मानवता स्थापित करण्यासाठी प्रयत्नशील असण्या ऐवजी इतरांना हानी कशी पोहचवता येईल यासाठी जास्त क्रियाशील आपण असतो त्याचा परिणाम थेट आपल्या मन स्थिती वर होऊन आपली आत्म शांती भंग पावते.इतरांना हानी पोहचवण स्वतःसाठी देखील हानिकारक असतं हे कळत नाही म्हणून अज्ञानात घडत.आपले विचार शुद्ध असतील तर ते आपले मित्र ठरतात आणि अशुद्ध असतील तर शत्रू ठरतात.शत्रू विचार हे आपल्या अशुद्ध कर्माच बीज असतं याची जाणीव ठेवून आपण कर्म सिद्धांत जपला पाहिजे.**

मानवता स्थापित करण हा मानवी धर्म असून याच तंतोतंत पालन केलं तर इतरांच्या साठी व स्वतःसाठी देखील आपण लाभदायक लाभकारी असतो.पण दुर्दैवाने असं होतं नाही मनुष्य आपल्या कर्माने इतरांना हानी नुकसान पोहचवत असतो.तर निरर्थक निरूपयोगी बाबींवर चिंतन करून स्वतःची मनस्थिती बिघडवत असतो. इतरांना व स्वतःला त्रासाचं कारण मनुष्य स्वतःअसतो हे वास्तव असून मानवतेचा विसर पडल्याने असं कृत्य होत असत.जीवन उद्देश समजला तर मग मात्र अशा पद्धतीने कृती होत नाही.मानवता वादी मार्ग स्वीकारण्यासाठी आध्यत्मिक ज्ञान मार्ग हा प्रभावी उपाय असून स्थिर बुद्धी हि जीवनात स्थिरता निर्माण करते तर बुद्धीची अस्थिरता हि जीवन अस्थिर करते. दैनंदिन कर्म करताना आपली ज्ञान बुद्धी विवेक जागृत असला पाहिजे आपलं आचरण कर्म हे इतरांच्या साठी त्रास दायक नाही तर लाभदायक ठरल पाहिजे.कर्म सिद्धांत समजला तर आपलं आपल्या प्रत्येक कृतीवर नियंत्रण असतं आणि कर्म सिद्धांत समजला नाही तर मग मात्र आपणं आपल्याला वाटेल तसं कार्य कर्म करतो आणि या वाटेल तश्या कर्माचा अनेकदा इतरांना त्रास होतो.कर्म करताना आपलं कर्म इतर कोणत्याही जीवांसाठी हानीकारक ठरणार नाही याची काळजी दक्षता हिच खरी मानवता असते पण मानवतेचा विसर पडला कि मग अमानवी कृत्याला खतपाणी मिळत असतं.आणि कळत नकळतच आपल्या हातून अमानवी कृत्य घडतात यामुळे इतरांची हानी तर होतेच पण त्या सोबतच आपण स्वतः ला देखिल अस्थिर करतो.वरकरणी जरी आपण स्वतःला मजबूत समजत असलो तरी देखील वास्तवात अंतःकरणाने आपण बैचेन असतो अनितीच कर्म जीवनात स्थिरता लाभू देत नाही.जसं कर्म असतं तशी मनस्थिती असते.सरळ सात्विक कर्म असेल तर मनस्थिती उत्तम असते यामध्ये यत्किंचितही शंका नाही. पण यदाकदाचित जर आपलं कर्म इतरांना त्रास होईल असं असेल तर स्वभाविक रित्या आपण वैचारिक अस्थिर असतो.आपलं कर्म आपली शारिरीक मानसिक स्थिती निर्धारित करत असत म्हणून योग्य कर्म करून स्वतःला व्यवस्थित सुस्थितीत ठेवता येण सहज शक्य असतं.जे सहज शक्य आहे ते आपण करत नाही उलटपक्षी जीवन किचकट होईल अस्थिर बेचैन होईल अशा कर्माला आपण स्वतः निमंत्रण देत असतो.आपली जीवनदशा निर्धारित होण्यासाठी आपण स्वतः जबाबदार असतो.हि बाब योग्य वेळी समजली तर मग अनुचित कर्म आपण नक्कीच करू शकत नाहीत.जीवन हितार्थ कर्म सिद्धांत समजणं अंत्यंत गरजचे आहे.कर्म सिद्धांत समजला तर आपण आपल्या कर्मावर नियंत्रण स्थापित करतो त्यामुळे जीवनात स्थैर्य निर्माण होत.आपली मनस्थिती व्यवस्थित राहते आणि इतरांना देखील आपला त्रास होत नाही.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत) आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# कोरडवाहू शेतात कपाशीची उलंगवाडी

## पावसाच्या लहरीपणामुळे शेतकरी पुरता खचला

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यात व सावळदबारा परिसरात पावसाच्या लहरीपणामुळे शेतकरी पुरता खचला आहे. त्यात चालू वर्षातसुद्धा अनेक शेतकऱ्यांनी कपाशी पिकावर केलेला खर्च निघाला नसताना कपाशीची उलंगवाडी झाल्याची चित्र सावळदबारासह सोयगाव तालुक्यात परिसरात पहावायास मिळते, गतवर्षीच्या प्रारंभी कपाशी पिकाला सोयगाव तालुक्यात परिसरात बाजारभाव बऱ्यापैकी असल्याने चालू वर्षात मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांनी कपाशी बियाणे पेरणीचे नियोजन केले होते. पेरणीपूर्वी मशागतीची कामे करीत मृग नक्षत्र लागताच बियाणे व रासायनिक खते खरेदी करण्यासाठी बाजारात गर्दी केली.

याचाच लाभ उठवत अनेक कृषी केंद्र चालकांनी बियाण्यांचा तुटवडा निर्माण करून ८५० रुपयाला मिळणारी कपाशी बियाण्यांची खर्चही निघाला नाही एक बैंग विनापावती १२०० ते १३०० रुपयांना शेतकऱ्यांना देऊन एक प्रकारे शेतकऱ्यांची आर्थिक लूट केल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला होता.तसेच शेतकऱ्यांकडून मोठ्या प्रमाणात कपाशी पिकाची पेरणी केली. असे नियोजन होते मृग नक्षत्रात पावसाने हुलकावणी दिल्याने तीन आठवडे पेरण्या उशिरा सुरू केल्या. शेतकऱ्यांसमोर आर्थिक संकट अवकाळी पावसामुळे हरभरा पिकांची नासाडी झाल्याने हरभरा पिकांत जनावरे सोडून उलंगबाढी केली तर पाठोपाठ कोरडवाहू कपाशीची उलंगवाडी सुरू झाली आहे. त्यामुळे शेतीला लावलेला खर्च निघाला नाही व अनेक शेतकऱ्यांना आर्थिक संकटाला सामोरे जावे लागत आहे.

गतच्या प्रारंभी कपाशील सोयगाव बाजारभाव चांगला होता . या आशेवर चालू वर्षात कपाशी पेरणीपूर्व मशागतीची कामे पूर्ण केली . बियाण्यांचा तुटवडा निर्माण झाल्याने बाजारभावापेक्षा अधिक रक्कम देऊन बियाणे खरेदी केले . शेती मशागत ते कापूस वेचणीपर्यंत एकरी ३० हजार रुपये खर्च झाला . मात्र, उत्पादन एकरी चार–पाच किटल आले . बाजारभावसुद्धा ६ ते ६२०० रुपये आहे . अशावेळी कपाशीची उलंगवाडी झाली .
**विजय काळे पत्रकार तथा शेतकरी, सोयगाव**

एकरी ३० ते ३५ हजार रुपये खर्च कपाशी पेरणी पूर्व मशागत ते कापूस वेचणीला प्रारंभ होईपर्यंत एकरी ३० ते ३५ हजार रुपयांहून अधिक खर्च झाला . मात्र, अनेक शेतकऱ्यांना अद्यापपर्यंत कापूस वेचणीला मजूर मिळत नसल्याने प्रारंभ सुद्धा झाला नाही तर काही शेतात कपाशीची उलंगवाडी झाली आहे . कर्ज काढून शेतीख केला . जुलै महिन्यात आलेल्या पुरात पिके उद्धस्त झाली होती . त्यानंतर रब्बी हंगामात हरभरा पेरणी केली . मात्र, नोव्हेंबर महिन्याच्या अखेरीस आलेल्या अवकाळी पावसाने हरभरा पिकांची उलंगवाडी केली . अशाच प्रकारे कपाशी पिकाचे झाले . कपाशी पिकाला लावलेला खर्चसुद्धा बाजारभाव लक्षात घेता निघत नाही, असे दिसत आहे .सोयगाव परिसरात कापसाची अशी उलंगवडी झाल्याचे दिसते .
**दिलीप दिनकर देशमुख, शेतकरी, सावळदबारा, ता . सोयगाव**



# वाशीम येथे 'छत्रपती'च्या अश्वारुढ पुतळ्याची पायाभरणी

## सर्वपक्षीय, सर्वधर्मिय व सामाजिक संघटनांची बैठक; खा.भावना गवळी यांचा पुढाकार

आधुनिक केसरी न्यूज

**वसंत पाटील**

**वाशिम :** जिल्ह्याचे मुख्यालय असलेल्या वाशीम शहरात छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारुढ पुतळा उभारण्याच्या दृष्टीने आज १९ रोजी शासकीय विश्रामगृह येथे सर्वपक्षीय, सर्वधर्मिय तसेच विविध सामाजिक संघटनांची बैठक पार पडली.या बैठकीत २३ जानेवारी रोजी अकोला नाक्यावर छत्रपतींच्या भव्य अश्वारुढ पुतळ्याचा पायाभरणी सोहळ्याबाबत निर्णय घेणार आला.तर येत्या १९ फेब्रुवारीला शिवजयंतीच्या मुहूर्तावर या पुतळ्याचे लोकार्पण करण्यात येणार असल्याचे बैठकीत सर्वानुमते ठरविण्यात आले.

शिव छत्रपतींच्या अश्वारुढ पुतळा उभारणीसाठी खा. भावना गवळी यांनी पुढाकार घेतल्याने वाशीमकरांची स्वप्नपुर्ती होणार असून शिवप्रेमींमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

सदर बैठकीस खा.भावनाताई गवळी, जेष्ठ पत्रकार माधवराव अंभोरे, माजी नगराध्यक्ष लक्ष्मणराव इंगोले, माजी आमदार अॅड़ विजयराव जाधव, माजी आ. पुरुषोत्तम राजगुरु, मराठा सेवा संघाचे अशोकराव महाले, प्रा.दिलीप जोशी, जिल्हा परिषद उपाध्यक्ष चक्रधर गोटे, मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष नारायणराव काळबांडे, जिजाऊ ब्रिगेडच्या कोषाध्यक्ष संजिवनीताई बाजड, विभागीय अध्यक्ष सुरेखा आरु, राजुभाऊ चौधरी, संभाजी ब्रिगेडचे विभागीय अध्यक्ष गजानन भोयर, बाजार समितीचे सभापती माधवराव काकडे, सुभाष चौधरी यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रारंभी मान्यवरांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या मागणीला खा. गवळी यांच्या पुढाकाराने मुर्त स्वरुप कशाप्रकारे आले याचा गत दोन दशका तील प्रवास सांगीतला.वाशीम शहरात छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारुढ पुतळा उभारावा अशी मागणी अनेक वर्षापासूनची होती. या मागणीची धार कमी झाल्याने हळूहळू पुतळा उभारणीची मागणी मागे पडली होती. मागील दोन वर्षात ही मागणी अधिक जोरकसपणे पुढे आली.यासाठी खा.गवळी देखील अनुकुल असल्याने त्यांनी शिवप्रेमींच्या या जिव्हाळ्याच्या मागणीला हात घातला. त्यानुषंगाने खासदार गवळी यांनी वाशीम शहरात पुतळा उभारणीसाठीची जागा निश्चित करुन शासन व प्रशासन स्तरावर सातत्याने पाठपुरावा केला.व तांत्रीक बाबी पुर्ण करून घेत पुतळा उभारणीचा मार्ग प्रशस्त करून घेतला. त्यानुसार स्थानिक अकोला नाका परिसरातील छाबडा पेट्रोल पंप लगतच्या मोकळ्या जागेमध्ये छत्रपती श्री शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा उभारणी कामाचा पायाभरणी कार्यक्रम विविध मान्यवरांच्या उपस्थितीत मंगळवारी होत आहे.

शिवजयंतीच्या मुहूर्ताला अर्थात १९ फेब्रुवारीपर्यत पुतळा उभारणी पूर्ण करुन लोकार्पण करण्यात येणार आहे.खासदार भावनाताई गवळी यांनी दिलेला शब्द पाळून पुतळा उभारणीच्या कामास मुर्त स्वरूप दिल्यामुळे नागरीक तथा शिवप्रेमींनी आनंद व्यक्त केला आहे. शिवसेनेच्या खासदार भावनाताई गवळी यांच्या पुढाकारातुन निर्माण होत असलेल्या छत्रपती श्री शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याचे काम अंतीम टप्प्यात आले असुन रंगरंगोटी व पुतळ्यावर शेवटचा हात फिरवीणे सुरु आहे.

# शालिवाहन पतसंस्थेचे ज्येष्ठ सभासद असलेल्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा मेळावा

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** येथील शासकीय,निमशासकीय,सेवेतून निवृत्त झालेले व शालिवाहन पतसंस्थेचे जेष्ठ सभासद असलेल्या सेवा निवृत्त कर्मचाऱ्यांचा मेळावा व शालिवाहन दिनदर्शिका प्रकाशन सोहळ्याचे आयोजन शुक्रवारी करण्यात आले होते. याप्रसंगी तहसीलदार सारंग चव्हाण,सहा निबंधक अनिल पुरी,पोलीस निरीक्षक संजय देशमुख,मुंबई दुध संघाचे संचालक नंदलाल काळे यांच्या शुभहस्ते सेवानिवृत्त कर्मचारीचा सत्कार तसेच दिनदर्शिकाचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी चेअरमन किशोर चव्हाण यांनी निवृत्तीनंतर सभासदानी योग्य ठिकाणी आपल्या पैशाची गुंतवणूक करा कारण आज बहुतेक ठिकाणी घोटाळे सुरू असुन विविध ठिकाणी नागरिकाची फसवणूक होत आहे त्यामुळे आपल्या कष्टाचा पैसा खात्रीपूर्वक बँकेत गुंतवावा.शालिवाहन बँकेने आता तीनशे कोटीचे उद्दीष्ट ठेवले आहे.

तसेच शासकीय,निमशासकीय सेवेतून निवृत्त झालेल्या तसेच शालिवाहन चे सभासद असलेल्या जेष्ठ नागरीकाचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी मानद सचिव प्रकाश कासलीवाल, व्हॉ. चेअरमन डॉ.जयंत जोशी, दिपक आहुजा,गणेश लोहीया,दिपक लखमले, डॉ.पंडित कील्लारीकर,बाबासाहेब राऊत,सुनील शेळके,अँड राजेंद्र गोर्डे,सौ.सुमनबाई म्हस्के, श्रीमती सुमनबाई चौव्हाण, मुख्य कार्यकारी अधिकारी लक्ष्मण गायके, शाखा प्रशासक भरत कोंगे उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कर्मचारी रामदास संदळसे, ज्ञानेश्वर मांधरे, हेमंत भवरे, ज्ञानेश चौहान, देविदास पूर्णपात्रे, राहुल नवगिरे, सुरज शंकरे, विश्वास कावसंकर, सुदान घेगडे,श्रीनिवास गोसावी, परीक्षित गोसावी, प्रीतम घोडके, उज्वला म्हस्के, जय आंबेकर यांनी परिश्रम घेतले.



# पैठणमधील प्रत्येक गावात २२ जानेवारीला होईल कीर्तन

## विठ्ठलशास्त्री चनघटे यांचे अवाहन

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** अयोध्येतील श्री रामलल्लाच्या मुर्तीचा प्राणप्रतिष्ठा तसेच मंदिराचा अभिषेक सोहळा 22 जानेवारीला होणार आहे. म्हणजेच अयोध्या नगरी सजली असून त्यानिमित्ताने पैठण शहर तसेच तालुक्यातील गावागावात नामसंकितर्ण करावे, सकाळी घरापुढे रांगोळी काढुन मंदिरात भजन करून रामलल्लाच्या प्राणप्रतिष्ठापणाचे स्वागत करुन संध्याकाळी मंदिरात तसेच घरासमोर दिवे पेटवुन आनंत्सोव साजरा करण्याचे अवाहन आखील भारतीय वारकरी संप्रदायाचे मराठवाडा विभाग अध्यक्ष विठ्ठलशास्त्री चनघटे, जिल्हा सहअध्यक्ष नामदेव महाराज पोकळे, विष्णुकांत महाराज शास्त्री ,जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद महाराज महालकर, पैठण तालुकाध्यक्ष नाना महाराज काकडे, शिवानंद महाराज शास्त्री, ऋषिकेश महाराज नवले, बद्रीनाथ महाराज नवल, सुधाकर महाराज वाघ यांनी केले आहे.

# २२ जानेवारीपासून मिळणार बारावीचे प्रवेशपत्र

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे (राज्य मंडळ) बारावीची परीक्षा फेब्रुवारी-मार्चमध्ये घेण्यात येणार आहे. या परीक्षेसाठीचे प्रवेशपत्र राज्य मंडळाकडून २२ जानेवारी रोजी ऑनलाइन उपलब्ध करून देण्यात येणार असून, कनिष्ठ महाविद्यालयांनी कोणतेही शुल्क न घेता प्रवेशपत्राची प्रत विद्यार्थ्यांना उपलब्ध करून द्यायची आहे.

राज्य मंडळाच्या सचिव डॉ. अनुराधा ओक यांनी प्रसिद्धिपत्रकाद्वारे ही माहिती दिली. राज्य मंडळाने बारावीच्या परीक्षेचे अंतिम वेळापत्रक प्रसिद्ध केले आहे. त्यानुसार २१ फेब्रुवारी ते २३ मार्च या कालावधीत लेखी परीक्षा होणार आहे, तर तोंडी, प्रात्यक्षिक, अंतर्गत मूल्यमापन परीक्षा २ ते २० फेब्रुवारी या दरम्यान घेतली जाणार आहे. या पार्श्वभूमीवर राज्य मंडळाकडून २२ जानेवारीपासून प्रवेशपत्र उपलब्ध करून दिले जाणार आहे. कनिष्ठ महाविद्यालयांनी कोणतेही अतिरिक्त शुल्क न घेता प्रवेशपत्राची प्रत डाऊनलोड करून त्यावर प्राचार्यांचा शिक्का मारून विद्यार्थ्यांना उपलब्ध करून द्यायची आहे. प्रवेशपत्रात विषय, माध्यमाबाबत बदल असल्यास त्याच्या दुरुस्त्या शाळा- कनिष्ठ महाविद्यालयांनी विभागीय मंडळात जाऊन करून घ्यायच्या आहेत. प्रवेशपत्रावरील विद्यार्थ्याचे नाव, छायाचित्र, स्वाक्षरी या बाबतच्या दुरुस्त्या शाळा-कनिष्ठ महाविद्यालयांनी त्यांच्या स्तरावर करून त्याची प्रत विभागीय मंडळाकडे त्वरित पाठवायची आहे. छायाचित्र सदोष असल्यास त्यावर विद्यार्थ्याचे छायाचित्र चिकटवून प्राचार्यांनी त्यावर शिक्का मारून स्वाक्षरी करायची आहे.

# प्राथमिक शाळा मोलखेडा येथे वाचन समृद्धी अभियान, आरोग्य विषयक व्याख्यान

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील मोलखेडा येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत आज दि.17 रोजी "वाचन समृद्धी अभियान"व आरोग्य विषयक व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून शालेय व्यवस्थापन समिती उपाध्यक्ष पंकज वाघ सर व प्रमुख पाहुणे सेवा निवृत्त राजमल हजेरी चव्हाण सर यांची उपस्थिती होती. तोंडाचे व दाताचे आरोग्य फारच महत्त्वाचे आहे.मौखिक व दंत आरोग्याची काळजी घेतली तर आपण निरोगी जीवन जगू शकतो. ब्रश करण्याच्या पद्धती, हात स्वच्छ करण्याच्या पद्धती, कान स्वच्छ करण्याच्या पद्धती, आदी छोट्या छोट्या पण मोठ्या गोष्टींवर सेवा निवृत्त चव्हाण सर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी त्यांनी कानातील मळ काढणे, हाताची स्वच्छता,नखे काढणे, दाताची स्वच्छता आदी प्रात्यक्षिक करून दाखवली व शाळेचे मुख्याध्यापक अवधूत सर,बाजुळगे सर, चौधरी सर, संदीप कळसकर, आनंदा वारांगणे यांनी विद्यार्थ्यांकडून दशकोटी पर्यंत संख्या वाचन घेण्यात आले विद्यार्थी यांना मुख्याध्यापक अवधूत सर यांनी सोप्या पद्धती सांगितल्या इयत्ता पहिली ते सातवी विद्यार्थी यात सहभागी झाले होते.सर्व विद्यार्थ्यांकडून प्रात्यक्षिक करून घेतली.आरोग्य विषयक माहितीचे काही व्हिडिओज स्क्रीनवर विद्यार्थ्यांना दाखवण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केंद्र प्रमुख एस बी राठोड मॅडम यांनी केले तर आनंदा वारांगणे सर यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संदीप कळसकर,शालेय समितीचे अध्यक्ष राजूभाऊ वारागंणे यांनी परिश्रम घेतले.



# कविता जाधव पाठारे मिसेस इंडिया 2023 ची विजेती

आधुनिक केसरी न्यूज

**सचिन खंडारे**

**बुलडाणा :** मातृतिर्थ सिंदखेड राजाची सुकन्या कविता विनायकराव जाधव-पाठारे यांना अलीकडेच फॉरएव्हर स्टार इंडिया (FSIA) मिसेस इंडिया महाराष्ट्र 2023 ची विजेती म्हणून गौरविण्यात आले. FSIA ही भारतातील सर्वात मोठ्या सौंदर्य स्पर्धांपैकी एक म्हणून ओळखली जाते - या २०२३ वर्षीचा ग्रँड फिनाले जयपूरच्या मॅरियट हॉटेलमध्ये आयोजित करण्यात आला होता. कविता ह्या मूळची सिंदखेड राजा जि.बुलडाणा येथील रहिवासी आहे आता मुंबईत राहतात. त्या भारतीय कपास निगम चे महाव्यवस्थापक व्हि. जी.जाधव (विनायक गोपाळा जाधव) सिंदखेड राजा यांच्या त्या कन्या आहेत तसेच बुलडाणा जिल्हा पत्रकार संरक्षण समितीचे कार्यध्यक्ष पत्रकार बाबासाहेब जाधव यांच्या भगीनी आहे. कविता जाधव पठारे यांनी हे प्रतिष्ठेचे विजेतेपद पटकावले आहे. भारतातील एका आघाडीच्या फॅशन इन्स्टिट्यूटमध्ये सहयोगी प्राध्यापक म्हणून कार्यरत असून एक पत्नी, एक आई, एक मुलगी, एक बहीण आणि एक शिक्षिका आदी भूमिका कविता यशस्वीरित्या निभावताना आता मिसेस महाराष्ट्र म्हणून त्या नृत्य, लेखन या त्यांच्यात असणाऱ्या अनेक प्रतिभा समाजासमोर दाखवत आहेत . या स्पर्धेसाठी त्यांनी मनापासून ग्रूमिंग कार्यशाळा, रॅम्प वॉक, फॅशन सामग्री आणि ब्रँडसाठी खास सोशल मीडियाचा उपयोग केला . त्यांच्या बहु-प्रतिभाने प्रभावित होऊन, तिला FSIA च्या अवॉर्ड्स नाईटसाठी सन्माननीय अतिथी म्हणून आमंत्रित करण्यात आले होते, जिथे त्यांनी सुपरस्टार मलायका अरोरा खानसोबत स्टेज शेअर केला होता. कठोर परिश्रम आणि समर्पण नेहमीच फळ देते आणि स्त्रिया देखील यशस्वी होऊ शकतात आणि विशिष्ट वयात सर्व क्षेत्रात त्यांची बालपणीची स्वप्ने साध्य करू शकतात याचा त्या स्वतः जिवंत पुरावा आहे. शिवाय, हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे की कविता यांनी नुकताच सहा महिन्यांपूर्वीच पेन्ट्रीच्या दुनियेमध्ये प्रवास सुरू केला होता आणि त्या या क्षेत्रात अगदी नवीन असून या ठिकाणी दररोज नवनवीन उंची गाठत आहेत आणि अनेक सौंदर्य स्पर्धांची विजेती म्हणून त्यांची स्वप्ने पूर्ण करत आहेत . इतक्या कमी वेळेत. कविता यांनी 2023 मध्ये पुण्यात ताज इव्हेंट्स आणि



प्रॉडक्शन्सने आयोजित केलेल्या मिसेस इंडिया फर्स्ट रनर-अप आणि मिसेस फॅशन आयकॉनचे पहिलेच विजेतेपद जिंकले आणि तेव्हापासून त्या या स्पर्धेत अखंडपणे कार्यरत आहेत . कविता सांगतात, "प्रत्येक मुलीने आयुष्यात एकदा तरी सौंदर्य स्पर्धेत सहभागी होण्याचे स्वप्न पाहिले पाहिजे , मी देखील वयाच्या १८ व्या वर्षी 1994 मध्ये मिस इंडियासाठी अर्ज केला होता, तेव्हा मी ते काही अपरिहार्य कारणांमुळे करू शकले नाही पण आता नंतर वर्षानुवर्षे, मला असे वाटले की मी पुन्हा एकदा प्रयत्न करते आणि मी खूप आनंदी आहे की मी स्वतःवर विश्वास ठेवला आणि एक संधी वयाच्या ४८ व्या वर्षी मिळाली आणि त्या संधीचं मी सोनं केलं .. तुमच्या वयाचा याच्याशी काहीही संबंध नाही, फक्त जिद्द आणि धैर्य असणे, आत्मविश्वास असणे, उत्कटता आणि विश्वास असणे आवश्यक आहे.

आंबेडकरी बौद्ध महिला म्हणून, या व्यासपीठाचा उपयोग महिला आणि तरुण मुलींना, विशेषतः वंचित समूहातील महिलांना सक्षम करण्याचा त्यांचा मानस आहे. महिलांनी आणि समुदाय आणि त्यांना घाबरू नका आणि पुढे जा आणि विश्वासाची झेप घ्या त्यांची स्वप्ने. कविता सध्या त्यांच्या स्वतःच्या यशाची चव चाखत आहे आणि स्पष्टपणे म्हणते की, "हो...ये तो बस शुरुआत है ! अभि और असमान छूना बाकी हैं ! ". अबला ठरविलेल्या महिलेने तिचे पंख पसरवायचे आहेत आणि तिची प्रतिभा अधिक मोठ्या प्रमाणात या जगाला दाखवायची आहे असे त्या म्हणाल्या. या क्षेत्रात भविष्यात मॉडेल आणि अभिनेत्री म्हणून मीडिया उद्योगात मोठ्या प्रमाणावर संधी उपलब्ध असून हा स्पर्धेचा चांगला प्लॅटफार्म यासाठी उपलब्ध आहे. असेही त्या म्हणाल्या. या त्यांच्या यशाबद्दल त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# सिल्लोड येथे शंकर पटाचे बक्षीस वितरण

## ३०० बैलजोड्या स्पर्धेत सहभागी

आधुनिक केसरी न्यूज

**सिल्लोड :** मंत्री ना. अब्दुल सत्तार यांच्या संकल्पनेतून सिल्लोड नगर परिषद आयोजित सिल्लोड महोत्सव अंतर्गत सिल्लोड येथे सुरू असलेला तीन दिवसीय भव्य राज्यस्तरीय शंकरपट उत्साहात पार पडला. या शंकर पटाला उत्स्फूर्तपणे प्रतिसाद मिळाला. जवळपास ३०० बैल जोड्या या स्पर्धेत सहभागी झाल्या होत्या. उपनगराध्यक्ष अब्दुल समीर यांच्याहस्ते या स्पर्धेच्या दोन गटातील तिघे विजेत्यांना मोटार सायकल तर एकूण ६० गुणानुक्रमे विजेत्यांना जवळपास ४ लाख रुपयांचे रोख बक्षिसे देण्यात आले आहे अशी माहिती सोयगाव पंचायत समितीचे माजी सभापती धरमसिंग चव्हाण यांनी बोलताना सांगितले.ते पुढे म्हणाले की या स्पर्धेत सामान्य गटातून छत्रपती संभाजीनगर येथील मनोहर चव्हाण यांच्या लखन - जलवा बैल जोडीने ५.९२ सेकंदात अंतर कापून प्रथम क्रमांक पटकावला. तर चिखलठाणा छत्रपती संभाजीनगर येथील किशोर दिवटे यांच्या रुद्रा - राणा बैलजोडीने ६.०३ सेकंदात अंतर कापून द्वितीय क्रमांक पटकावला. त्यासोबतच स्थानिक गटातील नानेगाव ता. सिल्लोड येथील नशीब मिस्तरी यांच्या बब्या - बादल बैलजोडीने ५.९० सेकंदात अंतर कापून प्रथम क्रमांक पटकावला. प्रथम क्रमांक विजेते मनोहर चव्हाण यांना होंडा युनिकोर्ण मोटर सायकल, तर द्वितीय क्रमांक विजेते किशोर दिवटे यांना होंडा शाईन मोटर सायकल तसेच स्थानिक गटातील प्रथम विजेते नसीब मिस्तरी यांना होंडा शाईन मोटार सायकल बक्षीस उपनगराध्यक्ष अब्दुल समीर यांच्याहस्ते देण्यात आले.

अशी देण्यात आली बक्षिसे स्पर्धेतील सामान्य गटातील तृतीय क्रमांक विजेते सावंगी अवघडराव ता. भोकरदन येथील मदन जोहरे यांना ५१ हजार, तर यवतमाळ जिल्ह्यातील फुलसावंगी येथील आसेफ खा जुम्मा यांनी चतुर्थ क्रमांक पटकावला त्यांना ४१ हजार तसेच स्थानिक गटातील सिल्लोड येथील शेरू मामा यांनी द्वितीय क्रमांक पटकावला त्यांना २१ हजार तर घटांब्री येथील सुभाष पाटील आणि विकास ढगे यांना ११ हजार रुपये यासह जवळपास ५२ जणांना एकूण ४ लाख रुपयांची बक्षिसे देण्यात आली.आपला प्रतिसाद आणि सहकार्य यामुळेच ही स्पर्धा यशस्वीपणे व उत्साहात संपन्न झाली असल्याचे स्पष्ट करीत उपनगराध्यक्ष अब्दुल समीर यांनी सर्वांचे आभार मानले. शंकरपट बैलगाडा स्पर्धेत काही उणिवा राहिल्या असतील त्या पूर्ण करून पुढील वर्षी देखील याहून अधिक मोठा शंकरपट आयोजित करण्यात येईल अशी ग्वाही उपनगराध्यक्ष अब्दुल समीर यांनी दिली. शंकरपटाच्या समारोप प्रसंगी उपविभागीय पोलीस अधिकारी दिनेशकुमार कोल्हे, पोलीस निरीक्षक शेषराव उदार, गणेश खैरे पत्रकार सावळदबारा, जिल्हा परिषद सदस्य गोपीचंद जाधव, सरपंच सुरेश चव्हाण घाणेगाव तांडा, जिल्हा बँकेचे अर्जुन गाढे, शिवसैनिक, मान्यवर,शंकर पटधारक मोठ्या संख्येने उपस्थित होते अशी माहिती माजी सभापती धरमसिंग चव्हाण यांनी बोलताना सांगितले.





# सोन्याचे दागिने चोरणाऱ्या महिलेला अखेर डी. बी. पथकाने केले जेरबंद

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा :** चिखली येथील सोनाराच्या दुकानातून सोन्याचे दागिने चोरणाऱ्या महिलेला चिखली पोलिसांच्या डी. बी. पथकाने अखेर जेरबंद केले आहे. सविस्तर वृत्तांत असा की चिखली येथील नयन विलास अप्पा बोंद्रे रा . स्तंभ चौक चिखली यांनी दिनांक सात जानेवारीला चिखली पोलीस स्टेशनला फिर्याद दिली होती की दि. ६ जानेवारी रोजी १४ - ३० च्या सुमारास प्रियंका ज्वेलर्स चिखलीतून एक सोन्याचे बिस्किट वजन 63 ग्रॅम 200 मिली अंदाजे किंमत , ४ लाख १ हजार ३२० रू .किमतीचे सोने अनुकळी तीन महिला व एक लहान मुलगी यांनी चोरून नेले आहे, यावरून पोलिसांनी कलम ३७९ नुसार आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला होता,या संदर्भात चिखली पोलीस स्टेशनचे ठाणेदार पोलीस निरीक्षक संग्राम पाटील यांनी याबाबत डि . बी पथक यांना गुन्ह्या संदर्भामध्ये आरोपींचा शोध घेण्याच्या सूचना दिल्या होत्या. डि. बी. पथकाचे इन्चार्ज पोऊनि .नितीनसिंग च चौव्हाण व डी. बी .पथकाने घटनास्थळी जाऊन पाहणी केली असता,तांत्रिक तपासाच्या आधारे आरोपी निष्पन्न करण्यात आले. सदर आरोपी महिला ह्या गेवराई जि . बीड . व अंबड जि. जालना येथील असल्याचे तपासात निष्पन्न झाले. सदर आरोपी महिलांचा गेवराई बीड व अंबड जिल्हा जालना येथे जाऊन चौकशी करण्यात आली,गुप्त बातमीदार लावून शोध घेणे सुरू असताना दि . १८ जानेवारीला गुप्त खात्रीशीर बातमी मिळाली की सदर सोने चोरणाऱ्या महिला आरोपी या चिखली बस स्टँड वर आलेल्या आहेत ,ठाणेदार संग्राम पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली दोन टीम तयार करण्यात करून सापळा रचण्यात आला ,महिला आरोपी पैकी एक महिला चिखली बस स्टैंड वर फिरताना आढळली ,तिला महिला पोलिसांनी ताब्यात घेतले व तिचे नाव विचारण्यात आले आरोपी महिलेने तिचे नाव निर्मलाबाई पंडित काळे वय ६२ वर्षे रा . शंकर नगर अंबड जिल्हा जालना असे सांगितले, 'तिला पोलीस स्टेशनमध्ये आणून तिची कसून चौकशी केली असता आरोपी महिला हिने तिची साथीदार नंदा, रा. अंबड जि. जालना व शितल नावाची महिला गेवराई बीड, हिच्या मदतीने गुन्हा केल्याची तिने कबुली दिली. तिला न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने एक दिवसाचा पिसिआर दिला आहे. पीसीआर दरम्यान तिची विश्वासात घेऊन चौकशी केली असता तिने चोरलेला मुद्देमाल हा शंकरनगर अंबड येथे ठेवल्याची कबुली दिली. फरार महिला आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर कारवाही पोलीस अंमलदार अमोल गवई राजेश मापारी पंढरी मिसाळ प्रशांत धंदर सागर कोल्हे निलेश सावळे, राहुल पायघन रोहिदास पंढरे महिला पोलीस रूपाली उगले पंचशीला ससाने,प्रियंका पन्हाळ ' अमोल राऊत यांनी केली .

# लोहा अभिवक्ता संघाच्या अध्यक्षपदी ॲड. बोनागिरे तर उपाध्यक्षपदी ॲड. भीमराव गोरे

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** अभिवक्ता संघाचा कार्यकाल संपुष्टात आल्याने नूतन अभिवाक्ता संघाची कार्यकारिणी गठित करण्यासाठी घेण्यात आलेल्या बैठकीत अभीवक्ता संघाच्या अध्यक्षपदी ॲड. नरेंद्र बोनागिरे यांची तर उपाध्यक्ष पदी ॲड. भीमराव गोरे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. लोहा न्यायालयातील वकील संघाच्या सभागृहात दि. १८ रोजी शुक्रवारी बैठक पार पडली. मागील अभिवक्ता संघाचा कार्यकाल संपुष्टात आल्याने संघाची नूतन कार्यकारिणी गठित करण्यात आली. लोहा अभिवक्ता संघाची कार्यकारिणी पुढील प्रमाणे - अध्यक्ष - ॲड. नरेंद्र बोनागिरे, उपाध्यक्ष- ॲड. भिमराव गोरे, सचिव- ॲड. विजयकुमार पवार, सहसचिव- अँड. सुरेंद्र नाईकवाडे, कोषाध्यक्ष - ॲड. परमेश्वर पाटील, ग्रंथालय प्रमुख - ॲड. सोमेश फुके, महिला प्रतिनिधी - ॲड. कविता पौळ आदींची सर्वानुमते निवड करण्यात आली. सदरील



बैठकीस ॲड. डी. पी. बाबर, ॲड. जी. एस. डांगे, ॲड. एस. बि. कांबळे, ॲड. बि. आर. गायकवाड, ॲड. कोळनुनकर, ॲड. पि. यु. कुलकर्णी, ॲड. व्ही. एम. चव्हाण, ॲड. एस. जी. जाधव, ॲड. जे. वाय. पठाण, अँड. एस. एल. लूंगारे, ॲड. एस. व्ही. गरुडकर, ॲड. एन. के. वरपडे, ॲड. व्ही. टी. मच्छेवार, अँड. अरविंद मोटरवार, ॲड. बडवणे, अँड. सतिश ताटे, अँड. के. के. बारखिंड, ॲड. एच. एम. पाटील, ॲड. व्ही. एन. घोडके, ॲड. आर. डब्ल्यु. दासरे, अँड. डी. व्ही. केंद्रे, ॲड.. पि. एम. शेटे, अँड. संजय क्षीरसागर, ॲड. नामदेव ढोबरे, अँड. अंकुश चव्हाण, ॲड. तुषार बाबर, ॲड. व्ही. एम. दिग्रसकर, अँड. प्रविण राठोड, ॲड.. जयश्री क्षीरसागर, ॲड. डी. एस. खांदोडे-क्षीरसागर, अँड. अन्नपूर्णा गवते आदींसह बहुसंख्य वकिलांची उपस्थिती होती.

# शाळा सुशोभिकरणासाठी लोक वर्गनीतून उभा केला पैसा

## खडकी सदार येथील शिक्षकांच्या जिद्दील सलाम

आधुनिक केसरी न्यूज

**शंकर सदार**

**रिसोड :** राज्य शासन ज्या शाळाची पट संख्या कमी आहे, त्या शाळा बंद करण्याच्या तयारीत आहे. मात्र याला फाटा देत खडकी सदार येथील जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकांचे कौतुव करावे तितके कमीच आहे. शाळेच्या सुशोभिकरणासाठी गावातून वर्गनी शाळेचे मुख्यध्यापक आणि सर्व शिक्षक करत आहेत.

जिल्हा परिषद शाळा म्हटले की, दहा ते पाच शिक्षक येणार आणि आपली डिवटी करुन जाणारा शिक्षक असेच सर्वाचा समज असतोय. मात्र याकडे बघण्याचा दुष्टिकोण खडकी सदार येथील शिक्षकाने बदूल टाकला आहे. सकाळी सात ते संध्याकाळी सहा वाजेपर्यंत हे सर्व शिक्षक शिकवत असतात. आज पर्यंत सर्व शिक्षिकांने नवदोयच्या परिक्षेत पाच ते सहा विद्यार्थी त्यांनी लावले आहेत. जिल्हा परिषद शाळा सध्या बंद पडण्याचा मार्गावर आहेत. यांचे कारण सुद्धा तसेच आहे, जिल्हा परिषद शाळेकडे लोकांचा बघण्याचा दुष्टिकोण सुद्धा बदला आहे. सर्वाणाच आपला मुलागा मुलगी चांगल्या शाळेत शिकला पाहिजे असे सर्वाच वाटत आहे. त्यामुळे मात्र जिल्हा परिषद शाळेकडे सर्वांचे दुर्लक्ष झाले आहे. खडकी सदार येथील शिक्षक या अपवाद ठरले आहे. शासनाच्या कुठल्याही निधीची वाट न बघता ते सध्या गावतून लोक वर्गनी जमा करुन शाळेच्या सुशोभिकरणासाठी आलेला पैसा वापरत आहेत. शिक्षकांची मेहनत आणि जिद्द बघून गावातील नागरिकाकडून सुद्धा त्या अतिशय चांगल्या प्रकारे प्रतिसाद मिळत आहे.





शिक्षिकाचे अतिशय चांगल्या प्रकारे विद्यार्थांवर लक्ष राहते. दिलेला अभ्यास पूर्ण करुन घेण्यासाठी आम्हाला वेळोवेळी फोन येत असते. तसेच मुलांनासाठी वेगवेळे कार्यक्रम सुद्धा आयोजत करण्यात येता. सर्व शिक्षक टीम उत्तम प्रकारे काम करत असते. आमच्या येथेल तालुक्यामधील शाळेतील विद्यार्थी सुद्धा गावामध्ये आणले आहेत. सध्या पटसंख्या सुद्धा चांगली आहे. **हरिभाऊ बाजड**

आमच्या येथील सर्व शिक्षक उत्तम प्रकारे काम करत असतात. सुट्टीच्या दिवशी सुद्धा ते विद्यार्थांना शाळेत शिकवण्यासाठी येत असतात. गावातील नागरिकांचा जिल्हा परिषद शाळेकडे बघण्याचा दुष्टीकोण बद्दला आहे. तसेच शाळेत सर्व शिक्षक विद्यार्थाकडे काळजीने लक्ष देण्याचे काम करत असतात. आता पर्यंत त्यांच्या मेहनतीच्या जोरावर नवोद्य परिक्षामध्ये गावातील बरचे विद्यार्थी लागले आहे. **नितीन रमेश सदार**

# वाळू माफियांचा अवैध उपसा सुरुच

## गौण खनिज समित्या सक्रिय करण्याची गरज

आधुनिक केसरी न्यूज

**रिसोड :** शासनाने गौण खनिजांचे अवैध उत्खलन व वाहतुकीस आळा आघण्यासाठी वेळोवेळी उपया योजना केल्या आहेत. तरी सुद्धा गौण उत्खनन आणि वाहतूक सुरु असल्याच्या काही घटना आपल्या दिसत असतात. यासाठी शासनाकडून अवैध वाळू उपसा रोखण्यसाठी ग्रामस्तरावर समिती स्थापन करण्यात आल्या आहेत. मात्र या समिती नावालाच असल्याचे दिसून येत आहे. रिसोड तालुक्यातील बोरखेडी, धोडप, करडा, मसलापेन, बाळखेड, येवती, शेलू खडसे, सरपखेड, या पेनगंगा काठावरील गावात मोठ्या प्रमाणात वाळू असते, मात्र सध्या कुठल्याच वाळू घाटाचा लिलाव झालेला नसल्याने मोठ्या प्रमाणात वाळू उपसा होत असल्याचे नागरिकांकडून बोलले जात आहे. या अवैध वाळू उपसा करणाऱ्या विरुध तहसीलदार प्रतिक्ष तेजनकर यांनी धडाकेबाज कारवाईची मोहीमच हाती घेतली आहे. रिसोड शहरात सध्या रात्रच्या वेळेस मोठ्या प्रमाणात अवैध वाळू खेळ सुरु असतो. अवैध वाळू उपसा होत असताना वेभान पद्धतीने वाहने चालवत असताना यावेळी अपघात होण्याची शक्याता असते. तसेच रिसोड शहारातून ग्रामाणी भागात रातोरात रात अवैध वाळूचा विल्लेवाट लावून, अव्वाच्या सव्वा भावात सध्या वाळू दिली जात आहे. अवैध गौण खनिल रोखण्यासाठी शासनाकडून गाव पातळीवर समित्या नेमण्यात आल्या आहेत. या समितीमध्ये गावाचे प्रथम नागरिक सरपंच, पोलीस पाटील, ग्रामसेवक, तलाठी, मंडळधिकारी यांच्या समावेश असतोय. मात्र या समित्या नावालाच असल्याचे दिसून येत आहे.

अवैध वाळू उपसा होत असतानात बऱ्याच वेळा अधिकाऱ्यांनी सकाळी सकाळी कारवाई केल्या आहेत. मात्र गाव पातळीवर नेमण्यात आलेल्या समितीच्या नजरेस एकदा सुद्धा अवैध गैणखनिज पडले नाही, हा सुद्धा एक मोठा चमत्कार असल्याचे बोले जात आहे. शासनाकडून स्थापन करण्यात आलेल्या समित्या सक्रिय करुन अवैध गौण खनिज करणाऱ्यावर कारवाई करण्यात यावी अशी मागणी परिसरातील नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# सोयगावात ४७ उमेदवार रिंगणात

## सुरेश चव्हाण : ८८ उमेदवारांनी अर्ज परत

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** कृषी उत्पन्न बाजार समितीसाठी अर्ज परत घेण्याच्या शेवटच्या दिवशी ८८ उमेदवारांनी अर्ज परत घेतल्यानंतर १८ जागांसाठी ४७ उमेदवार रिंगणात आहेत. सिल्लोड सोयगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचे एकत्रिकरण झाल्यानंतर पहिलीच होत असलेली ही सार्वत्रिक निवडणूक आहे या निवडणुकीसाठी १४१ उमेदवारांनी अर्ज दाखल केले होते. यापैकी सात उमेदवारांचे अर्ज छाननी मध्ये बाद झाल्यानंतर शिल्लक राहिलेल्या १३४ उमेदवारी अर्ज पैकी मंगळवार दिनांक १६ जानेवारी या अर्ज परत घेण्याच्या शेवटच्या दिवशी ८८ उमेदवारांनी अर्ज परत घेलले यामुळे १८ जागांसाठी ४७ उमेदवार अशी माहिती सरपंचपती सुरेश चव्हाण घाणेगाव तांडा यांनी बोलताना सांगितले.निवडणूक रिंगणात आहेत या आहेत व्यापारी मतदारसंघातून ४ तर हमाल मापाडी मतदारसंघातून ३ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. उमेदवारांचे बुधवारी चिन्ह वाटप झाल्यानंतर प्रत्यक्ष प्रचारास सुरुवात होईल.

सहकारी संस्था ११ जागांसाठी सर्वसाधारण गटातून १७, महिला राखीव गटातून ४, इतर मागासवर्गीय मतदार संघातून २, तर विशेष जाती भटक्या जमाती मतदार संघातून २ असे अकरा जागांसाठी २५ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. ग्रामपंचायत मतदार संघातून ४ जागांसाठी १५ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत यात सर्वसाधारण प्रवर्गाच्या दोन जागांसाठी ८, अनुसूचित जाती जमातीच्या एक जागेसाठी ४, तर दुर्बल घटक मतदार संघातील एका जागेसाठी ३ उमेदवार निवडणूक रिंगणात या निवडणुकीसाठी सिल्लोड तालुक्यातील ८४ सहकारी संस्थांचे १०६८ मतदार, १०३ ग्रामपंचायतीचे १००६ मतदार, व्यापारी मतदारसंघासाठी १००५ तर हमाल मापाडीसाठी ११११ मतदार आहेत. सोयगाव तालुक्यातील ३६ सोसायटी चे ४३९ ग्रामपंचायतीचे मतदार, ४६ ४०९ व व्यापारी मतदारसंघातील ७४ तर हमाल मापारी मतदारसंघातील ७० मतदार आहेत. एकूण ५१९० मतदार संख्या असल्याचे माहिती सरपंचपती सुरेश चव्हाण सामाजिक कार्यकर्ते घाणेगाव तांडा यांनी दिली.



# सातव्या वेतन आयोगासाठी कर्मचाऱ्यांचे उपोषण

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** राज्य परिवहन महामंडळाच्या कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगाचा लाभ मिळावा, या मागणीसाठी सेवाशक्ती संघर्ष एसटी कर्मचारी संघाच्या वतीने जिल्हा शासकीय रुग्णालयासमोर बेमुदत साखळी उपोषण सुरू करण्यात आले आहे. उपोषणाच्या माध्यमातून आंदोलकर्त्या कर्मचाऱ्यांनी अडचणींचा पाढा वाचत सातवा वेतन आयोग लागू करण्यासाठी ठाम भूमिका घेतली आहे.

सातव्या वेतन आयोगानुसार राज्य सरकारी कर्मचाऱ्यांप्रमाणे सेवा ज्येष्ठतेनुसार वेतनश्रेणी लागू करावी, आंदोलन काळातील २७ ऑक्टोबर २०२१ ते २२ एप्रिल २०२२ हा आंदोलन कालावधी विशेष बाब म्हणून वार्षिक वेतनवाढ उपदानासाठी ग्राह्य धरण्यात यावा, २०१७ मधील आगार बदलीचे परिपत्रक रद्द करून शिस्त व आवेदन कार्य पध्दतीमधील जाचक अटी रद्द कराव्यात, रोख रक्कमविरहित वैद्यकीय योजना लागू करण्यात यावी, एप्रिल २०१६ पासून वार्षिक वेतनवाढ, महागाई भत्ता आणि घरभाडे याचा फरक मिळावा, विधान भवनात मान्य केलेल्या १६ मागण्यांची अंमलबजावणी करण्यात यावी, आदी मागण्या यावेळी करण्यात आल्या आहेत.

# महाराष्ट्र राज्य सेवानिवृत्त शिक्षक कर्मचारी, अधिकारी संघटनेची कन्नड शाखेची कार्यकारणी

आधुनिक केसरी न्यूज

**पिशोर :** महाराष्ट्र राज्य सेवानिवृत्त शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व अधिकारी संघटना तालुका कन्नड शाखेची नवनिर्वाचित कार्यकारणीची निवड जिल्हाध्यक्ष तात्याराव चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवारी (दि.१८) जानेवारी रोजी कन्नड येथील आयोजित बैठकीत करण्यात आली.

त्यामध्ये कन्नड तालुका शाखेच्या अध्यक्षपदी बाबुराव गोविंदराव सोनवणे, उपाध्यक्षपदी युसुप शेख दादा शेख, बाबासाहेब माधवराव महाले, सचिवपदी अशोक एकनाथ येवले, कोषाध्यक्ष ए.आर.चव्हाण, कार्याध्यक्ष मच्छिंद्र शंकरराव चव्हाण, मार्गदर्शक देवपुरी गोस्वामी, मच्छिंद्र दाभाडे, वसंतराव बडग, संघटक ए.पी पाटील, ए.व्ही.भाले, आर.जी.धनेधर, महिला प्रतिनिधी प्रमिला पराडकर, शोभा तातेराव जाधव यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. यावेळी संघटनेचे विभागीय सचिव गणेश राठोड,



विभागीय कार्याध्यक्ष सी.एम.रमणे, विभागीय नेते मच्छिंद्र हारदे, सूर्यकांत बढे, बी.के.नलावडे, बन्सी रहाणे, ए.व्ही.भाले, यु.सी.घावरी, नंदू शेजवळ यांची प्रमुख उपस्थिती होती. जि.प.प्रशाला कन्नडचे मुख्याध्यापक दिलीप गायकवाड यांचे मोलाचे सहकार्य व मार्गदर्शन लाभले. नवनिर्वाचित अध्यक्ष बाबुराव सोनवणे बोलताना म्हणाले की, संघटनेच्या माध्यमातून तालुक्यातील सेवानिवृत्त शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी व अधिकारी यांची प्रलंबित प्रश्न सोडवण्यासाठी नेहमी निस्वार्थ भावनेने प्रामाणिक प्रयत्न केले जातील. असे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले आहे.

# बालपणी आईने सांगितलेल्या रामायण आणि महाभारतातील प्रसंगातून सामाजिक संस्कारासह समाजकार्याची प्रेरणा

## आ. किशोर जोरगेवार : प्रभाताई जोरगेवार यांच्या जयंतीनिमित्त साहित्य वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** स्वामी तिन्ही जगाचा आई विना भिकारी ही कवी यशवंत यांची ओळ तंतोतंत सत्य आहे. आज माझी आई जगात नाही. मात्र प्रत्येक क्षणी ती स्मरणात असते. तिने बालपणात केलेले संस्कार हिच जोरगेवार कुटुंबीयांची खरी संपत्ती आहे. तिच्या संस्कारातुन आज जोरगेवार कुटुंब भक्कम उभे आहे. आईने बालपणी सांगितलेल्या रामायण, महाभारतातील प्रसंगातून सामाजिक संस्कारासह समाजकार्याची प्रेरणा मिळाली असे प्रतिपादन आमदार किशोर जोरगेवार यांनी केले.

स्व. प्रभाताई जोरगेवार यांच्या जयंती निमित्त सरदार पटेल महाविद्यालयातील सभागृहात स्व. प्रभाताई जोरगेवार चॅरिटेबल फाऊंडेशन ट्रस्टच्या वतीने साहित्य वाटप करण्यात आले होते. या प्रसंगी ते बोलत होते. या कार्यक्रमाला सर्वोदय शिक्षण मंडळाच्या अध्यक्षा श्रीमती सुधाताई पोटदुखे, सचिव भरत पोटदुखे, सहसचिव डॉ. किर्तीवर्धन दिक्षीत, प्रा. श्याम धोपटे, प्राचार्य प्रमोद काटकर, कल्याणी किशोर जोरगेवार, आमदार किशोर जोरगेवार यांच्या बहिण उज्वला पार्लेवार, प्रसाद किशोर जोरगेवार, माजी नगर सेवक बलराम डोडाणी, माता महाकाली महोत्सव समीतीचे सचिव अजय जैस्वाल, योग नृत्य परिवाराचे संस्थापक अध्यक्ष, गोपाल मुंधडा आदींची मंचावर उपस्थिती होती. यावेळी पूढे बोलताना आ. जोरगेवार म्हणाले. मला जन्म देणारी आणि माझे पालन पोषण करणारी अशा दोन आई आम्हाला मिळाल्या. यासाठी आम्ही स्वतःला भाग्यवान समजतो. अत्यंत गरीब परिस्थितीत आम्ही बालपण जगले. नंतर स्वतःचा व्यवसाय सुरु केला. हलाकिच्या या परिस्थितीतही तीने कधी अप्रामाणीक होऊ दिले नाही. विचलीत होउन मिळालेल्या क्षणिक सुखा पेक्षा समाधानाची भाकर खाउन जगायची शिकवण तिने दिली. मी डॉक्टर व्हावे तिची इच्छा होती. पण ते परिस्थितीमुळे शक्य झाले नाही. इंग्रजी माध्यममध्ये माझे शिक्षण तिला करायचे होते. मात्र फी भरण्यास आम्ही सक्षम नव्हतो. आईने वारंवार शाळा व्यवस्थापनाशी विनवनी केली. मुलासाठी आईचा आग्रह पाहुन शाळाचे संस्थापक, अध्यक्ष राजेंद्र खजानजी यांनी मला इंग्रजी माध्यमात दाखल करून घेतले. एका खाजगी शाळेत फी न भरता इंग्रजी माध्यमात शिकणारा कदाचित मी पहिला विद्यार्थी असेल असेही ते यावेळी आईंच्या आठवणी सांगताना म्हणाले. माझ्यावर शस्त्रक्रिया झाली त्यावेळी राजेंद्र खजाजनी यांनी त्याकाळी मला १०० रुपयाची मदत केली होती असेही यावेळी बोलतांना ते म्हणाले मी राजकारणात जावे ही आईची इच्छा नव्हती. मात्र 2009 च्या निवडणूकीत मला पक्षाचे टिकीट मिळाले नाही. तेव्हा मी पक्षाने दिलेल्या उमेदवारासाठी काम केले. ते निवडुन आले. रात्रो विजय मिरवणूक निघाली. या विजय मिरवणुकीत सगळ्यांच्या समोर राहण्याच्या उत्सुकतेत मी मात्र मागे राहिलो. हे आईने पाहिले आणि तु नेहमी मागे राहतो, मात्र आता तु पूढे राहा, राजकारणात जा, मी असेल कि नसेल पण तू आमदार बनायचं हे वाक्य आईच्या तोंडून निघाले होते. माझ्या इच्छेसाठी तिने तिच्या ईच्छेविरोधात मला राजकारनात काम करायला सांगीतले हे केवळ आईच करु शकते असे ते यावेळी म्हणाले. त्यानंतर मी कधीही थांबलो नाही. कष्ट प्रामाणीकता आणि सेवा या तिच्या शिकवणी प्रमाणे वागण्याचा प्रयत्न केला. आणी तो सदैव करेल असे ते या प्रसंगी बोलताना म्हणाले. या कार्यक्रमात दिव्यांग बांधवांना व्हिल चेअर, प्लास्टिक मॅटिन, योग नृत्य परिवाराला ध्वनीक्षेपन संच आणि नरसिंह आखाडा बाबूपेठ व योग नृत्य परिवार यांना प्लास्टिक खुर्चीचे, गरज वंतांना उपयुक्त साहित्याचे तसेच क्रीडा क्षेत्रातील खेळाडूंना खेळउपयोगी साहित्याचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. श्याम धोपटे व संचालन शिक्षिका सरोज चांदेकर यांनी केले यावेळी डॉ किर्तीवर्धन दीक्षित यांचेही मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाला यंग चांदा ब्रिगेड व विविध सामाजिक संघटना नागरिकांची उपस्थिती होती.





## शेलुखडसे येथे मंदीर परिसरात स्वच्छता

आधुनिक केसरी न्यूज

**रिसोड :** प्रभु श्रीरामचंद्र यांच्या मूर्ती प्राणप्रतिष्ठापना निमित्त संपूर्ण देशात भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे. याची प्रशासनाने दखल घेत ग्रामीण व शहरी भागात मंदीर परिसरात विशेष स्वच्छता कार्यक्रम राबविण्याच्या सूचना प्राप्त झाल्या आहेत. त्याअनुषंगाने शेलुखडसे येथील ग्राम पंचायत कडून मंदीर परिसरात स्वच्छता कार्यक्रम पार पडला आहे. येथील संत गजानन महाराज मंदीर व हनुमान मंदीर परिसरात ग्राम पंचायत कडून स्वच्छता करण्यात आली. हातात झाडू,पोचे, खराटे घेऊन सरपंच,उपसरपंच, ग्राम पंचायत सदस्य, ग्रामसेवक तसेच ग्राम पंचायत कर्मचारी यांनी मंदीर परिसरात स्वच्छता केली. दरम्यान या कार्यक्रमात येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक आणि विद्यार्थी यांनी देखील उत्स्फूर्त सहभाग घेतला होता.

## श्री सखाराम महाराज विद्यालयात आनंद मेळावा

आधुनिक केसरी न्यूज

**वसंत पाटील**

**वाशिम :** जिल्ह्यातील प्रतिपंढरपुर म्हणून ओळखले जाणारे तीर्थ क्षेत्र लोणी बु. येथील संत सखाराम महाराज विद्यालयात सांस्कृतिक विभागाअंतर्गत नुकतेच आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्राचार्य कल्याण जोशी होते,तर सरपंच प्रिया चौगुले यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.

श्री सखाराम महाराज विद्यालय कनिष्ठ महाविद्यालय लोणी येथे सांस्कृतिक विभाग अंतर्गत आनंद मेळाव्याचे आयोजन दिनांक 18 जानेवारी 2024 रोजी करण्यात आले होते. या आनंद मेळावाचे उद्घाटन कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्राचार्य कल्याण जोशी होते तर उद्घाटक म्हणून सरपंच प्रिया चौगुले, प्रमुख अतिथी म्हणून पंचायत समिती सदस्य चंद्रभागा नवले, करुणाताई पाठक , तंटामुक्तीचे अध्यक्ष राजू चौगुले, पालक प्रतिनिधी चंद्रकांत बरले उपस्थित होते. यावेळी अध्यक्षपदावरून बोलताना प्राचार्य कल्याण जोशी म्हणाले की विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या कलागुणांचा विकास व्हावा ह्या उद्देशाने आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले .आनंद मेळावा मुळे विद्यार्थ्यांच्या पाककला या गुणांना वाव मिळतो. त्याचबरोबर विद्यार्थ्यांना व्यवहार ज्ञानाची माहिती होते. या आनंद मेळाव्यामध्ये 39 स्टॉलच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी विविध खाद्यपदार्थांची विक्री केली. आनंद मेळाव्यातील चविष्ट खाद्यपदार्थाची खरेदी करून विद्यार्थ्यांनी आनंद लुटला. या कार्यक्रमाचे संचालन व प्रास्ताविक प्रा. मंगेश पांडे यांनी केले. या आनंद मेळाव्याला विद्यार्थ्यांसह पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## रोहमारे कनिष्ठ महाविद्यालयात पत्रकार सन्मान सोहळा

आधुनिक केसरी न्यूज

**निफाड :** माध्यमे ही समाजमनाचा आरसा असून माध्यमातून समाजमनाचे प्रतिबिंब त्यात प्रतिबिंबीत होत असते. त्यातून समाज जागृत करण्याचे काम माध्यमे करत असतात. हे करत असतांना बदनामी होऊ नये हा पत्रकारांचा पहिला प्रामाणिक हेतू असतो असे प्रतिपादन प्राचार्य एन.जी.बारे यांनी केले.

पत्रकार दिनाचे औचित्य साधत के.बी. रोहमारे कनिष्ठ महाविद्यालय चासनळी येथे आयोजित पत्रकार सन्मान सोहळ्यात कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून ते बोलत होते. याप्रसंगी जेष्ठ पत्रकार माणिकराव उगले, निवृत्ती शिंदे यांनी पत्रकारीता व त्यापुढील आव्हाने यावर उपस्थितांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ढेकळे एस.पी यांनी तर आभार रणधीर ए.बी यांनी मानले. याप्रसंगी किरणकुमार आवारे, काकासाहेब खर्डे, निवृत्ती शिंदे, राजेंद्र गाडे, माणिक उगले, प्राचार्य बारे एन.जी, ढेकळे एस.पी, रणधीर ए. बी, पवार एस.बी, चव्हाण, बी.टी, कहार पी.डी, काळे एस.डी, श्रीम.शेलार जे.एस, प्रा.कु.डोंगरे के.आर, शहाणे एच.डी, सोनवणे डी व्ही, बर्डे एस.एम, तसेच विद्यार्थी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.





# विद्यार्थ्यांना 'सत्यशोधक' मोफत दाखविल्याने सन्मान

## सत्यशोधकचे निर्माते आप्पासाहेब बोराटे यांच्या हस्ते दिले स्मृतिचिन्ह

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** 'सत्यशोधक' या चित्रपटाचे निर्माते आप्पासाहेब बोराटे तसेच चित्रपटातील इतर कलाकार शिरवळ, ता.खंडाळा येथील आझाद थिएटर येथे दि.१७ जानेवारी २०२४ रोजी आले होते.सत्यशोधक हा सिनेमा शिरवळ येथील आझाद थिएटरमध्ये पाहावा यासाठी ज्यांनी-ज्यांनी योगदान दिले होते, अशा सर्वांना स्मृतीचिन्ह देऊन त्यांचा सन्मान करण्यासाठीच चित्रपटाचे निर्माते आप्पासाहेब बोराटे तसेच चित्रपटातील इतर कलाकार यांनी हजेरी लावली होती.

"सत्यशोधक'या चित्रपटाच्या माध्यमातून फुले दांपत्यांच्या जीवन कार्यावर विशेष प्रकाशझोत टाकल्या बद्दल तसेच त्यांचे कार्य जनतेपर्यंत पोहोचविण्याचा एक चांगला प्रयत्न केल्याबद्दल निर्माते आप्पासाहेब बोराटे यांच्यासह कलाकार यांचा सुद्धा सत्कार करण्यात आला. यावेळी हा सत्कार शिरवळचे लोकनियुक्त सरपंच रविराज दुधगावकर, ग्रामपंचायत सदस्य राहुल तांबे आणि सामाजिक कार्यकर्त्या उज्वला संतोष तांबे यांनी केला.

शिरवळ ता.खंडाळा येथे हा चित्रपट विद्यार्थी शिक्षकवृंद आणि महिला वर्ग यांना दाखविण्यासाठी अनेकांनी पुढे येत आर्थिक योगदान दिले.शिरवळ गावचे लोकनियुक्त विद्यमान सरपंच रविराज दुधगावकर, विद्यमान ग्रामपंचायत सदस्य राहुल तांबे, सामाजिक कार्यकर्त्या उज्वला संतोष तांबे यांनी आदर्श विद्यालय, शिरवळ, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, शिरवळ (मुले) यांच्या विद्यार्थ्यांना हा मोफत सिनेमा दाखवण्याचा मनापासून यशस्वी प्रयत्न केला. त्याचबरोबर क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे जन्मस्थान असलेल्या नायगाव येथील महिलांना दादासाहेब नेवसे यांनी देखील सत्यशोधक सिनेमा दाखवला. रमेश मारुती यादव यांनी केसुर्डी येथील शाळेतील विद्यार्थ्यांना देखील हा सिनेमा दाखवला. भोळी आणि माने कॉलनी येथील विद्यार्थ्यांनी पालक आणि शिक्षक संतोष नेवसे, शिक्षिका राजश्री जाधव यांच्या सहकार्याने हा सिनेमा पाहिला आहे. क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांचे जन्मस्थान असलेल्या नायगाव येथील नायगाव ग्रामपंचायतीने देखील तेथील विद्यार्थ्यांना हा सिनेमा दाखवला आहे. ज्यांनी ज्यांनी आर्थिक योगदान दिले.अशा सर्वांचा सत्कार सत्यशोधकचे निर्माते आप्पासाहेब बोराटे यांच्या हस्ते स्मृतीचिन्ह देऊन करण्यात आला. हा सिनेमा महाराष्ट्र शासनाने सुद्धा टॅक्स फ्री केलेला असला तरी कमी पैशांमध्ये विद्यार्थ्यांना, शिक्षकांना व महिलांना चित्रपट कमी दाखवण्याचा निर्णय आझाद थिएटरचे मालक अशपाक शमशुद्दीन खान उर्फ काली शेठ, आझाद थिएटरचे व्यवस्थापक विजय घोलप व त्यांचे सर्व सहकारी यांनी घेतलेला आहे.फुले दांपत्याचे कार्य नव्या पिढीला शालेय विद्यार्थ्यांना तसेच महिलांना समजावे म्हणून शिरवळ परिसरातून चांगले प्रयत्न होत आहेत. २५ जानेवारीपर्यंत सत्यशोधक हा सिनेमा दररोज दु. १२ वा विद्यार्थी, शिक्षक तसेच महिलांना दाखवला जाईल. यासाठी शिरवळ व शिरवळ परिसरातील व खंडाळा तालुक्यातील सर्व शाळा व माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक तसेच सोसायटीमधील महिलांनी हा सिनेमा पहावा तसेच काही सामाजिक कार्यकर्त्यांनी व दानशूर व्यक्ती, संघटना, संस्था,मंडळे यांनी हा सिनेमा पहावा म्हणून योगदान द्यावे असे आवाहन चित्रपटाचे निर्माते आप्पासाहेब बोराटे, कलाकार व ज्यांनी ज्यांनी हा सिनेमा विद्यार्थी, शिक्षक आणि महिलांना मोफत दाखवला त्यांनी केले आहे.




# शासकीय गायरान जमिनी नावावर करण्यासाठी वंचितचे आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** शासकीय गायरान जमीनी नावे करण्यासाठी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने २२ जानेवारी रोजी फुलंब्री तहसील कार्यालयावर अमरण उपोषण व धरणे आंदोलन करण्यात येणार आहे. अशी माहिती तालुका वंचित बहुजन आघाडी चे पदाधिकारी यांनी दिली.

तसेच या मागण्यांसंदर्भात फुलंब्री चे तहसीलदार डॉक्टर कृष्णा कानगुले यांच्या कडे निवेदन देण्यात आले असून तर दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, परिपत्रक प्रमाणे शासकीय गायरान जमिनी नावे करण्यासाठी ४० वर्षापासून अतिक्रमण धारकांचा संघर्ष चालू आहे तरीही जमिनी नावे करण्यात आल्या नाही ज्या लोकांनी शासन निर्णय प्रमाणे शासकीय जमिनीवर गरिबी आणली अशा लोकांना सुद्धा अतिक्रम हटवण्याच्या नोटीस शासनाने दिले आहे. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेअंतर्गत महावितरण कंपनीला शेतीसाठी अतिक्रम केलेली जमीन देण्याचा निर्णय घेतला तो रद्द करण्यात यावा जे करून अतिक्रमधारकांवर उपासमारीची वेळ येणार नाही शासकीय गायरान जमीन अतिक्रमण धारकाच्या नावे करण्यात यावे, यासाठी लोकशाही मागनि २२ जानेवारी रोजी फुलंब्री तहसील कार्यालय समोर वंचित बहुजन आघाडी च्या वतीने धरणे आंदोलन व आमरण उपोषणास बसणार आहे. दिलेल्या निवेदनावर जिल्हा सहसंघटक मनोज जाधव तालुकाध्यक्ष सांडू श्रीखंडे, तालुका कार्याध्यक्ष पप्पू जाधव मच्छिंद्र नरवडे, शेख इस्माईल, शेख युनूस, हरिभाऊ बनसोडे, पार्वताबाई काटकर आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.



# चौदा वर्षानंतर सोशल मीडियाच्या माध्यमातून सर्वजण आले एकत्र

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील पाल येथील१३ संभाजीनगर येथील सावित्रीबाई फुले पदवी शिक्षण शास्त्र कॉलेजच्या माजी विद्यार्थ्यांचे तब्बल चौदा वर्षानंतर स्नेहसंमेलन छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित करण्यात आले होते.

या संमेलनात विद्यार्थ्यांनी कॉलेज जीवनातील आठवणीला उजाळा दिला.सिडकोतील सावित्रीबाई फुले डी.एडचे विद्यार्थी आता तलाठी. शिक्षक.लिपिक .व्यापारी उद्योजक इत्यादी क्षेत्रांमध्ये उत्कृष्टपणे काम करत आहे.शिक्षण पूर्ण झाल्यानंतर ताटातूट झालेल्या विद्यार्थ्यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून एकत्र येऊन तब्बल चौदा वर्षानंतर स्नेहमेलनचे आयोजन केले. यावेळी गेट-टुगेदर करण्यासाठी भाऊसाहेब जाधव. पल्लवी जंगले. जनार्दन बंगाळे.अरुण पंडित.नम्रता जावळे. प्रल्हाद धायतडक.सुरज खुरुद.वाल्मीक कुरणे. सोपान सोमासे. गणेश खेडकर.सुरेश पुरी.महेश भावले.सारिका देशमुख. ज्योती गरुड.अपूर्वा कुलकर्णी.अंजना जोशी. स्वाती बोढरे रोकडे आदींनी हजेरी लावली या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जनार्दन बंगाळे यांनी केले व भाऊसाहेब जाधव यांनी आपले मनोगत व्यक्त केले आणि आभार प्रदर्शन अरुण पंडित यांनी केले




# राममंदिर सोहळ्यानिमित्त अक्षता वितरण, निमंत्रण अभियानास विक्रमी प्रतिसाद

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** अयोध्येत साकारण्यात आलेल्या भव्य मंदिरात रामललांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा २२ जानेवारी २०२४ रोजी होते आहे. यानिमित्ताने अयोध्येतील श्रीराम जन्मभूमि तीर्थक्षेत्र न्यासाच्या, पुणे महानगर समितीतर्फे राबवण्यात आलेल्या अक्षता वितरण व निमंत्रण अभियानात पुणे शहर व परिसरात १३ लाख कुटुंबाशी संपर्क करण्यात आला.

या गृहसंपर्क अभियानातंर्गत प्रतिष्ठापना सोहळ्याच्या निमित्ताने पुणेकरांना अयोध्येतील रामललाच्या दर्शनाचे निमंत्रण देण्यासाठी न्यासाच्या वतीने एकूण ३५ हजार ३८२ राम सेवकांनी सहभाग घेतला. त्यात १० हजार १७८ महिलांचा सहभाग आहे. त्याची पूर्वतयारी म्हणून शहरांमध्ये विविध वस्त्यांमध्ये १ हजार २०० पेक्षा अधिक छोट्या बैठका घेतल्या गेल्या. १ ते १५ जानेवारी २०२४ या कालावधीत संपूर्ण पुणे शहर व परिसरात हे गृहसंपर्क अभियान राबवण्यात आले.

श्रीराम जन्मभूमि तीर्थक्षेत्र न्यास, पुणे महानगर समितीतर्फे आयोजित पत्रकार परिषदेत श्रीराम जन्मभूमि तीर्थक्षेत्र न्यासाच्या पुणे महानगर समितीचे संयोजक प्रसाद लवळेकर, सहसंयोजक अभिजित बर्वे, विश्व हिंदू परिषद पुणे महानगर पूर्व भाग मंत्री धनंजय गायकवाड यांनी ही माहिती दिली.यावेळी पतित पावन संघटनेचे शहराध्यक्ष श्रीकांत शिळीमकर,विश्वास मणेरे विहिंप पश्चिम भाग सह मंत्री दिनेश लाड यांची उपस्थिती होती.या निमित्ताने संपूर्ण देश पुन्हा राममय व्हावा, या हेतूने श्रीराम जन्मभूमि तीर्थक्षेत्र न्यासतर्फे, पुणे महानगर समितीने हे अभियान आयोजित केले होते. समाजातील सर्व स्तरातील लोक मोठ्या संख्येने अयोध्येतील प्रभू श्रीरामाचे भव्य मंदिराच्या स्वप्नपूर्तीनिमित्ताने या अभियानात व जल्लोषात स्वयंस्फूर्तीने सहभागी होत असल्याचे चित्र संपूर्ण पुणे महानगरात पाहायला मिळते आहे.अभियानादरम्यान याची वेळोवेळी प्रचिती आल्याचे प्रसाद लवळेकर यांनी यावेळी आवर्जून सांगितले. याचाच परिपाक म्हणून सोमवार, २२ जानेवारी रोजी समाजातील सर्व नागरिक, गृहनिर्माण संस्था, मंदिरे, गणेश व नवरात्र मंडळे, संस्था, संघटना व विविध कॉर्पोरेट कंपन्यांकडून देखील पूर्ण पुणे महानगरात सुमारे सात हजारांहून अधिक उत्सव व कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. अभियानात प्रत्येक कुटुंबात जावून राम भक्तांनी शुभकार्याचे निमंत्रण दिले. अक्षता, सोबत निमंत्रण, मंदिराच्या माहितीचे आणि मंदिराचा फोटो दिला. तसेच प्रतिष्ठापनेच्या दिवशी आनंदोत्सव साजरा करण्याचे, शहरात विविध ठिकाणी आयोजित कार्यक्रमांमध्ये सहभागी होण्याचे व राममंदिर निर्मितीच्या स्वप्नपूर्तीचा अनुभव घेण्याचे आवाहन करण्यात आले. कुटुंब संपर्काच्या वेळी अनेक कुटुंबांनी सर्व राम भक्तांचे भरभरून स्वागत केले. त्यांना धन्यवाद दिले. अनेक वेळा त्या अक्षता देवासमोर ठेवून भजन व आरती ही करण्यात आल्याचे असंख्य सुखद अनुभव रामभक्तांना आले. १ जानेवारी २४ रोजी आरंभलेल्या या अभियानात मंदिर, गुरुद्वारा, जैन मुनि, बौद्ध भिख्खू यांना अक्षता देऊन करण्यात आली. सुरुवातीला उपमुख्यमंत्री व पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार अक्षता देण्यात आल्या. समाजातील विविध थरातील मान्यवरांना प्रशासकीय, लष्करी तसेच पोलीस अधिकारी, उद्योजक, सामाजिक कार्यकर्ते, कलाकार, खेळाडू यांना निमंत्रणे देण्यात आली.

# भंडारा व्यसनमुक्ती केंद्राविरुद्ध मनपाची पोलीसात तक्रार

आधुनिक केसरी न्यूज


**चंद्रपूर :** शहरात विना परवानगी भिंतीपत्रके लावणाऱ्या भंडारा व्यसनमुक्ती केंद्राविरुद्ध महाराष्ट्र विद्रुपीकरण कायदा १९९५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्याबाबत चंद्रपूर महानगरपालिका झोन क्र. २ कार्यालयाद्वारे शहर पोलीस ठाणे येथे तक्रार दाखल करण्यात आली आहे.

शहरातील गांधी चौक,मिलन चौक,जयंत टॉकीज, शहरातील मुख्य रस्ते, रस्त्यांवरील झाडे तसेच विविध शासकीय व खाजगी परिसरात व्यसनमुक्ती केंद्राची जाहिरात करणारे स्टीकर्स, भिंतीपत्रके मनपाकडुन पूर्वपरवानगी न घेता लावले असल्याचे सहायक आयुक्त नरेंद्र बोबाटे यांना १७ जानेवारो रोजी पाहणीदरम्यान आढळुन आले.

संबंधितास भ्रमणध्वनीद्वारे संपर्क करून पत्रके काढण्यास सांगितले असता अद्याप पावेतो भिंतीपत्रके न काढल्याने भंडारा व्यसनमुक्ती केंद्र यांच्यावर महाराष्ट्र विद्रुपीकरण कायदा १९९५ अंतर्गत कलम ३ नुसार फौजदारी गुन्हा नोंद करण्यात यावा अश्या आशयाची तक्रार करण्यात आली आहे. जाहिरात करण्यास अश्या प्रकारचा अवलंब केल्याने शासकीय निधीचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते तसेच शहर सुशोभीकरणाच्या कामातही बाधा निर्माण होते .

भिंतीपत्रके,पोस्टर्स,बॅनरबाजीमुळे शहराच्या विद्रुपीकरण होते किंबहुना वाहतुकीसही अडथळा निर्माण होत असल्याने याबाबत उच्च न्यायालय आणि राज्य शासनाने आखुन दिलेल्या सुचनांनुसार कारवाई करण्यात येते. त्यानुसार, परवानगीशिवाय पॅम्प्लेट्स, बॅनर्स, होर्डिंग्ज,कापडी फलक लावणा-यांवर आर्थिक दंडासह कायदेशीर कारवाई करण्याची तरतूद या धोरणामध्ये करण्यात आली आहे.





विदर्भातील चंद्रपूर मूल मार्गावरील निसर्गरम्य असा हिरव्याकंच वनराईतून जाणारा हा मार्ग टिपलाय आहे आमचे आधुनिक केसरीचे विदर्भ समन्वयक प्रा. शाम हेडाऊ यांनी.

# राज्यमंत्री हंसराज अहीर यांना अयोध्या येथील प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचे निमंत्रण

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** संपूर्ण देशाचे लक्ष लागून असलेल्या प्रभू श्रीरामचंद्रांच्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्या करिता पुण्यभूमी अयोध्या नगरी सज्ज होत आहे . दि. 22 जानेवारी 2024 रोजीअयोद्धेमध्ये मर्यादापुरुषोत्तम प्रभु श्रीरामाच्या मुर्तीची प्राणप्रतिष्ठा होत असून या स्वर्णीम, ऐतिहासीक सोहळ्याच्या निमंत्रणाचा मान मिळाल्याने अतिव आनंद झाला, जीवन कृतार्थ झाले अशी भावना देशाचे माजी केंद्रीय गृह राज्यमंत्री तथा राष्ट्रीय ओबीसी आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहिर यांनी व्यक्त केली. देश विदेशातील काही मोजक्या अतिविशिष्ट व्यक्तींना अयोध्या येथील प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचे निमंत्रण देण्यात आले आहे यामध्ये चंद्रपूर येथील हंसराज अहिर यांचा समावेश झाल्याने संपूर्ण चंद्रपूरकरांनाच आनंद झाला आहे. या भव्यदीव्य प्राणप्रतिष्ठा सोहळ्यामुळे चंद्रपूर जिल्ह्यातील तसेच लोकसभा मतदार क्षेत्रातील नागरीकांमध्ये देखील अतिव आनंदाचे व उत्साहाचे वातावरण आहे. मला मिळालेल्या निमंत्रणाबद्दल सर्व संबंधित आदरणीयांचा कायम ऋणी राहील. अशा भावना राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष तथा पुर्व केंद्रीय गृह राज्यमंत्री हंसराज अहीर यांनी व्यक्त केल्या. सर्व श्रीराम भक्तांनी 22 तारखेला श्रीराम ज्योती प्रज्वलित करून दिपोत्सव साजरा करावा, असे आवाहन सुध्दा त्यांनी केले आहे.



# नूतन माध्यमिक विद्यालयाचा लवकरच होणार कायापालट

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील नूतन माध्यमिक विद्यालय व मध्य विद्यालय वावना येथे मोज़ेक इंडिया प्रायव्हेट लिमिटेड व एस एम सेहगल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने चालू असलेल्या फुलंब्री तालुक्यातील 8 गावात कृषी ज्योती प्रकलापांतर्गत ग्राम विकासाची कामे चालू आहेत त्याचाच एक भाग म्हणून वावना येथील नूतन माध्यमिक व उच्या माद्यामिक विद्यालयाचे, नूतनीकरण व सुशोभीकरण करण्यासाठी संस्थेकडून निवड करण्यात आली शुभारंभ कार्यक्रम दि 18/1/2024 वार गुरूवार रोजी पार पडला

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष स्वप्नपुजा शिक्षण संस्था छत्रपती संभाजीनगर या संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती छायाताई जंगले पाटील या अध्यक्षस्थानी होत्या तसेच यावेळी त्यांनी शाळेच्या कामांमध्ये कोणती अडचण येणार नाहीत अशी हमी दिली तरी या कार्यक्रमाला उपस्थित म्हणून वावनागावचे सरपंच श्रीमती भागुबाई कैलास काकडे उपसरपंच दामोदर जाधव सोसायटीचे चेअरम योगेश जाधव ग्रामविकास अधिकारी लालवन येथील पोलीस पाटील तसेच तसेचशालेय समितीचे सदस्य केंद्रप्रमुख श्री मुगले सर तसेच पालक वर्ग व शाळेचे प्राचार्य श्री पल्हाळसर व सर्व शिक्षक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री शिंदे केबी यांनी केले व कार्यक्रम राष्ट्रगीताने शेवट होऊन पार पडला



# विद्यार्थ्याने स्व: कर्तुत्वाने आपल्या आयुष्याची योजना आखली पाहिजे : डॉ.पी.एम. शहापूरकर

आधुनिक केसरी न्यूज

**जालना :** महात्मा ज्योतिबा फुले सामाजिक कार्य महाविद्यालय जालना येथे करियर गायडन्स कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्राचार्य डॉ .शहापूरकर यांनी मार्गदर्शन केले. व अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वनंजे सर होते. यावेळी डॉ.शहापूरकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शनपर बोलताना सांगितले की विद्यार्थ्यांनी स्वःकृत्वने आपल्या आयुष्याची योजना आखली पाहिजे. विद्यार्थ्यांनी यश मिळेपर्यंत खचून न जाता जीवनात संघर्ष केला पाहिजे .व तुम्हाला यशस्वी होण्यापासून कोणी रोखू शकणार नाही . तसेच शिक्षणाबरोबर विद्यार्थ्याने इतर ऍक्टिव्हिटी मध्ये सहभाग नोंदवला पाहिजे. पुढे बोलताना म्हणाले की मराठवाड्याचा शिक्षणाचा दर्जा उंचवण्यासाठी सर्वांनी एकत्र येऊन प्रयत्न केले पाहिजे तसेच अध्यक्षीय समारोपात डॉ. वनंजे सर यांनी मार्गदर्शन करताना पुढे बोलताना म्हणाले की महाविद्यालय विद्यार्थीच्या सर्वांगीण विकासासाठी सदैव तत्पर आहे .या पुढे ही महाविद्यालय नाविन्यपूर्ण अनेक उपक्रम राबविणार असल्याची माहिती त्यांनी दिली. यावेळी डॉ शिंदे सर , ,कुरंगळ, वाघ ,झोटे, खरात रमेश, राठोड बबन,महागडे मॅडम , प्राध्यापक , महाविद्यालयीन कर्मचारी व विद्यार्थी आदि संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.हिवराळे सर यांनी केले तर डॉ. कहाळे सर यांनी आभार मानले.



हिवराळे क्लिनिक ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद

उपलब्ध सुविधा

- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे

पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन
अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

# कोयत्याने वार करून पत्नीला भररस्त्यावर पतीने संपवले

## जिंतूर तालुक्यातील बोरी पोलीस हद्दीतील घटना

आधुनिक केसरी न्यूज

**बि. डी. रामपूरकर**

**जिंतूर :** बऱ्याचवेळा समजून सांगूनही सोबत राहायला



तयार नसल्याचा राग अनावर झाल्यामुळे पतीने शाळेत शिक्षणासाठी जात असलेल्या पत्नीवर रस्त्यावरच कोयत्याने गळ्यावर चेहऱ्यावर वार करत हत्या केल्याची घटना जिंतूर तालुक्यातील बोरी गावात गुरुवारी (दि.१८) सकाळी सात वाजण्याच्या सुमारास घडली. जिंतूर तालुक्यातील बोरी येथे वालूर रोडवरील संभाजीनगर येथे राहणारी जयश्री वाव्हळ या मुलीचा विवाह काही वर्षांपूर्वी उस्मानाबाद जिल्ह्यातील भूम येथील रोहित गायकवाड याच्यासोबत झाला होता. रोहित गायकवाड हा छत्रपती संभाजीनगरात एका खाजगी कंपनीत कामाला होता. तेथेच पती-पत्नी राहत होते. परंतु गेल्या काही महिन्यापासून या दोघांमध्ये काही न काही कारणामुळे वादविवाद होत होते. या रोजच्याच वादामुळे पत्नी जयश्री वाव्हळ शालेय शिक्षणासाठी तिच्या आई-वडिलांकडे बोरी (ता. जिंतूर) येथे राहायला आली होती. पती हा मागील काही दिवसापासून तिला सासरी नांदायला येण्यासाठी आग्रह करीत होता. आज सकाळी तो छत्रपती संभाजीनगर येथून बोरी येथे आला होता. ग्रामीण रुग्णालयाच्या पाठीमागील रस्त्यावर त्याने पत्नीला गाठले. संभाजीनगर येथे राहण्याचा व ईतर कारणावरून दोघात वाद झाला. भांडणादरम्यान पतीने आपल्या जवळील कोयता काढून तिच्या गळ्यावर व चेह-यावर सपासप वार केले. हे वार एवढे गंभीर होते की, त्याची पत्नी रक्ताच्या थारोळ्यात तेथेच रस्त्यावर पडली. त्यानंतर संभाजी गायकवाड हा सरळ बोरी पोलीस ठाण्यात कोयत्यासह गेला आणि त्याने आपल्या पत्नीला मारले असल्याचे कबूल करून स्वतःला पोलिसांच्या स्वाधीन करून घेतले. घटनेनंतर ॲम्बुलन्स चालक व एका पोलीस कर्मचाऱ्याने तिला वाचवण्याचा प्रयत्न केला. परंतु परभणी येथे उपचारासाठी रुग्णालयात घेवून जात असताना रस्त्यातच तिचा मृत्यू झाल्याचे समजते. घटनेची माहिती मिळताच बोरी पोलीस ठाण्याच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक सरला गाडेकर, पोलीस उपनिरीक्षक अनिल खिल्लारे, पोलीस जमादार काळे, तूपसमंदर घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी घटनेचा पंचनामा केला असून अधिक तपास चालू आहे. दरम्यान उपविभागीय पोलीस अधिकारी गोफणे, परभणीच्या मोबाईल फोरेन्सिकचे अधिकारी यांनी घटनास्थळाला भेट देऊन माहिती घेतली.

**विद्यार्थी पालकांमध्ये या हत्येमुळे भीती :** मयत जयश्री बोरी येथील ज्ञानोपासक शाळेत वर्ग नववीमध्ये शिक्षण घेत होती. भर रस्त्यावर तिची कोयत्याने हल्ला करून हत्या करण्यात आली. यामुळे शालेय विद्यार्थी व त्यांचे पालक यांच्यामध्ये भीती पसरली आहे. सध्या शालेय विद्यार्थ्यांमध्ये मोबाईल वापरण्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. याचा अतिरेक होत आहे. याशिवाय पालकांचे विद्यार्थ्यांकडे गांभीर्यपूर्वक लक्ष नसल्याने अनुचित प्रकार मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. भर रस्त्यावर झालेल्या या हत्येमुळे नागरिकांत भितीचे वातावरण पसरले आहे.

# गणेश शिंदे यांचे 'जीवन सुंदर आहे'वर व्याख्यान

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** तालुका प्रेस क्लब व व्हाईस ऑफ मीडियाच्या वतीने दर्पण



दिनाचे औचित्य साधून जिंतूरकरांसाठी पुणे येथील ख्यातनाम व्याख्याते प्रा. गणेश शिंदे यांच्या" जीवन सुंदर आहे "या विषयावर व्याख्यानाचे आयोजन केले आहे. मागील अनेक वर्षापासून तालुका प्रेस क्लब व व्हाईस ऑफ मीडियाच्या वतीने जिंतूरकरांसाठी साहित्यिक व सांस्कृतिक मेजवानी आयोजित करण्यात येते. महाराष्ट्रातील ख्यातनाम व्याख्याते प्रा. नामदेवराव जाधव, प्रा. अमर हबीब ,कवी नारायणपुरी, अरुण पवार, भारुडरत्न स्वर्गीय निरंजन भाकरे, वऱ्हाडकार प्रा अशोक पवार, मुंबई येथील आईकारप्रा. प्रशांत मोरे, जयराम खेडेकर यांच्यासह अनेक मान्यवरांनी या व्याख्यानमालेत हजेरी लावली आहे.

यावर्षी महाराष्ट्रात आपल्या वक्तृत्वाने समाजमन जागृत करणारे प्रख्यात व्याख्याते प्रा .गणेश शिंदे यांच्या व्याख्यानेच्या आयोजन 21 जानेवारी रोजी सायंकाळी 6:00 वाजता जुनी मुन्सफी, भाजी मंडई जिंतूर या ठिकाणी करण्यात आले आहे या कार्यक्रमात विभागीय पातळीवरील पत्रकारांना पुरस्कार वितरण करण्यात येणार आहे शिवाय सहकार भूषण व उद्योग रत्न पुरस्कार ही देण्यात येणार आहे या कार्यक्रमासाठी जिंतूरकरांनी सहकुटुंब उपस्थित रहावे असे आवाहन व्हाईस ऑफ मीडियाचे मराठवाडा अध्यक्ष विजय चोरडिया, प्रेसक्लब,व व्हाईस ऑफ मीडियाच्या वतीने केले आहे.

# केंद्रीय वित्त विभागाने कर्मचाऱ्यांच्या करमुक्ती ऊत्पन्नाची मर्यादा 12 लाख करावी

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** केंद्रीय वित्त विभागाणे कर्मचाऱ्यांच्या करमुक्तीची मर्यादा वाढ करण्याची मागणी शिक्षक सेनेच्या वतीने राज्यउपाध्यक्ष विठुभाऊ चव्हाण यांच्या नेत्रत्वाखाली मा.जिल्हाधिकारीयांचे यांच्या मार्फात केंद्रीय अर्थमंत्री श्रीमती निर्मला शिताराम यांना जिल्हाधिकारी यांचे प्रतिनिधी तहसिलदार मा.विजय अधाने यांना देण्यात आले.

गेल्या दहा बारा वर्षापासून केंद्रीय वित्त विभागाने कर सवलतीच्या मर्यादामध्ये कुठलाच बदल केला नाही. परंतु महागाईच्या निर्देशकाने कर्मचाऱ्यांच्या वेतनात वाढ होत आहे.त्याच प्रमानात आयकर कराची पण वाढ होत आहे. कर्मचाऱ्यांना मिळणाऱ्या एकूण 12 महीण्याच्या वेतनातून जवळपास दिड ते दोन महीण्याचे वेतन आयकर खात्यात जमा करावे लागते आर्थात बारा महीने काम करुन कर्मचाऱ्यांचा हातात केवळ दहा महीण्याचाच पगात मिळतो ह्याचा अर्थ एक प्रकारे सरकार अन्याय करत आहे म्हणुन या निवेदनाद्बारेयेनाऱ्या अर्थसंकल्पाय अधिवेशनात कर्मचाऱ्यांची करमुक्ती ऊत्पनाची मर्यादा 12 लाख करणाय यावी आणि कर्मचाऱ्यांना न्याय द्यावा अन्यथा शिक्षक सेनासह सर्व शासकीय निमशासकीय कर्मचारी आंदोलन करत आहोत याची नोंद घ्यावी आसे दिलेल्या निवेदणात म्हटले आहे या निवेदनावर शिक्षक सेनेचे राज्यउपाध्यक्ष विठुभाऊ चव्हाण,जिल्हाध्यक्ष संतोष अंबुलगेकर जिल्हाध्यक्ष (खा.) तानाजी पवार सर SLOWLY सचिव (खा.)परसुराम येसलवाड सर जिल्हा सचिव(जि.प,) जिल्हा प्रशिध्दी प्रमुख राजेश पवार सर,नांदेड ता.अध्यक्ष प्रकाश फुलवरे सर व भिमराव सकनुरे आदीची उपस्थिती होती...



# जप्त करण्यात आलेले व बेवारस असलेले वाहन घेऊन जाण्याचे आवाहन : नाईक

आधुनिक केसरी न्यूज

**सचिन खंडारे**

**बुलढाणा :** सिंदखेडराजा तालुक्यातील सर्वात मोठे पोलीस स्टेशन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या साखरखेर्डा पोलीस स्टेशन अंतर्गत साखरखेर्डा पोलिसांनी काही जप्त केलेल्या दोन चाकी तीन चाकी चार चाकी तसेच काही बेवारस आढळलेले वाहने साखरखेर्डा पोलीस स्टेशनमध्ये लावण्यात आलेली आहेत. सदर वाहने ही अनेक वर्षापासून धुळखात पडलेली असून अनेक वाहन चालक मालकांना नेमकी गाडी कोणाची आहे हे माहीत नसल्यामुळे वाहने तसेच व बेवारस पोलीस स्टेशनमध्ये पडून असतात. पोलीस स्टेशन चा विषय असल्यामुळे तसेच चोरीची



शंका असल्यामुळे अनेक जण वाहने घेण्याकरता पुढे आलेले नाही. परंतु साखरखेर्डा पोलीस स्टेशनचे ठाणेदार स्वप्निल नाईक यांनी बेवारस पडलेले वाहने हे मूळ मालकांनी कागदपत्र आणून घेऊन जाण्याचे आवाहन केले आहे, यामध्ये ७६ दुचाकी वाहने, तिनचाकी व चार चाकी १४ वाहने, असे एकुन ९० वाहने आहे यामध्ये इंडिका कार ट्रॅक्टर या वाहनांचा सुद्धा समावेश आहे,ज्या मूळ मालकाचे वाहन असेल अशांनी मूळ कागदपत्र घेऊन कायदेशीर कारवाईसाठी साखरखेडा पोलीस अशी संपर्क साधण्याचे आवाहन सुद्धा ठाणेदार नाईक यांनी केली आहे. जर वाहनासाठी संपर्क साधला नाही तर आपल्याला वाहनाची आवश्यकता नसून सदर वाहने घेऊन जाण्यास इच्छुक नसल्याचे गृहीत धरून वाहना बाबत योग्य ती कारवाई करण्याचा इशारा सुद्धा साखरखेर्डा ठाणेदार स्वप्निल नाईक व पोहेकाँ पांडुरंग केदार यांनी दिला आहे.



# जतच्या जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थ्यांनी अनुभवले 'कुंभारकले' प्रात्यक्षिक

## विद्यार्थ्यांनी बनवली मातीची भांडी

आधुनिक केसरी न्यूज

**जत :** येथील ISO मानांकित, तबाखू मुक्त आणि मॉडेल स्कूल म्हणून नावाजलेल्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नं. 1 मध्ये मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या उपक्रमांतर्गत आणि परिसरभेट या अंतर्गत कुंभारकाम कला आणि प्रात्यक्षिक याचा अनुभव घेतला. कुंभारकाकांची मुलाखत घेऊन त्यांचे जीवन जाणून घेतले. मातीच्या भांड्याचा आरोग्याचा उपयोग जाणून घेतला.

कुंभार काका यांना शाळेमध्ये आमंत्रित करून प्रत्यक्षामध्ये मातीपासून कशी भांडी तयार केली जातात याची संपूर्ण प्रात्यक्षिक श्री कुंभार काका (पंढरपूर) यांनी शाळेमध्ये प्रत्यक्ष उपस्थित राहून सर्व विद्यार्थ्यांना अतिशय छान अशी माहिती दिली. प्रत्येक मुलांनी माती पासूनमाती पासून भांडी बनवण्याची प्रात्यक्षिक प्रत्यक्षात माती आणि त्यावरील चालणारे मातीचे चाक याचा प्रत्यक्ष अनुभव घेतला. प्रत्येक विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या पद्धतीचे भांडी त्या ठिकाणी बनवली. या अंतर्गत पैसे साठवणुकीची भांडी, संक्रांतीची भांडीकुंडी, पणती असे विविध प्रकारची भांडे प्रत्यक्ष बनवण्याचा अनुभव सर्व शाळेतील विद्यार्थ्यांनी घेतला. जवळ जवळ दोन तास या कार्यक्रमात गुंगून गेले.

मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा उपक्रमांतर्गत दररोज वेगवेगळ्या कार्यक्रमाचे आयोजन ही शाळा करत आहे. या उपक्रमांतर्गत सदर कुंभार काका यांचे सत्कार करण्यात आला. त्याचबरोबर इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांनी आणि विद्यार्थिनींनी कुंभार काका यांची मुलाखत घेतली. या मुलाखतीमध्ये विद्यार्थ्यांनी स्वतः प्रश्न निर्माण केलेले होते आणि अनेक प्रश्नांची उत्तरं कुंभार काका यांनी अतिशय स्पष्टपणे दिली. चालूच्या विज्ञान युगामध्ये अनेक बारा बलुतेदार पद्धती या लोप पावत असल्यामुळे त्या लोकांवर चाललेल्या बलोतीदारांना धीर द्यावा त्यात व त्यांच्या कामाची ओळख व्हावी आणि समाजामध्ये जनजागृती व्हावी या दृष्टीने आमच्या विद्यार्थ्यांनी असंख्य प्रश्नाची उत्तर कुंभार काका यांना विचारली. कुंभारकाका यांनी त्या सर्व विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना समर्थक अशी उत्तरे दिली आणि या विज्ञान युगामध्ये सध्या लोप पावत चाललेल्या या कलाकारान विद्यार्थ्यांच्या मनामध्ये एक सकारात्मक भूमिका निर्माण करण्याचे काम केले.शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मोहन माने -पाटील यांनी सर्व उपस्थित मान्यवरांचा सत्कार केला शाळेचे मुख्याध्यापिका उषा ढेरे, केंद्राचे केंद्रप्रमुख संभाजी कोडग यांनी या संपूर्ण कार्यक्रमाचे छान असं नियोजन होते.


शाळेतील सर्व शिक्षिका वर्षादेवी जगताप, आशा हावळे, सुजाता कुलकर्णी, मीनाक्षी शिंदे, सुनीता कदम, ज्योती भोसले, संगीता बटुळे, हनुमंत मुंजे शाळा, व्यवस्थापन समितीचे सदस्य, पालक, विद्यार्थी मोठ्या संख्येने या कार्यक्रमांमध्ये सहभागी झाले होते. शेवटी आभार संभाजी कोडग केंद्रप्रमुख त्यांनी मानले.

# महाराष्ट्रात गारठा वाढणार, हवामान खात्याचा अंदाज

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** उत्तरेकडील राज्यांमध्ये असलेल्या थंडीच्या लाटेचा परिणाम महाराष्ट्रावरसुद्धा होत आहे. राज्यात अनेक ठिकाणी वातावरण कोरडे झाले असून किमान तापमानात देखील घट होत आहे. मध्य आणि उत्तर महाराष्ट्रात थंडीचा कडाका वाढणार असून पुढील दोन दिवस ही थंडी कायम राहील, असा इशारा भारतीय हवामान खात्याने दिला आहे. देशाच्या उत्तरेकडील राज्यात थंडी कमी होण्याचे नावच घेत नाही. दिवसेंदिवस या राज्यांमधील किमान तापमानात घट होत असून थंडीचा कडाका वाढत चालला आहे. दरम्यान, काही दिवसांपूर्वी अवकाळी पावसाचे सावट असणाऱ्या महाराष्ट्रातसुद्धा किमान तापमानात घट होण्यास सुरुवात झाली आहे. उत्तरेकडील राज्यांमधील थंडीचे पडसात महाराष्ट्रात उमटत असून अनेक ठिकाणी वातावरण कोरडे झाले आहे. थंडीच्या लाटेमुळे महाराष्ट्रात देखील किमान तापमानात घट होण्यास सुरुवात झाली आहे. प्रामुख्याने उत्तर महाराष्ट्राला या शीतलहरींचा अधिक फटका बसत आहे.



## रमेश कोंदलकरांकडे रामचंद्राचा दरबार असलेले नाणे

आधुनिक केसरी न्यूज



**छत्रपती संभाजीनगर :** येथील अहिंसानगरचे रहिवासी रमेश नारायणराव कोंदलकर यांच्या कडे अतिशय प्राचीन प्रभू रामचंद्राचा दरबार असलेले 161 वर्षे (इ.स. 1862) जुने ईस्ट इंडिया कंपनीने काढलेला कॉइन (एक आणा) ज्यामध्ये श्रीरामचंद्र प्रभुंचा पुर्ण दरबार आहे. तसेच हनुमानाची पंचधातूची मूर्ती पूजेच्या मंदिरात आहे. (पाच पिढ्या जुनी) मुर्ती तिची नित्य पूजा आराधना केली जाते.

## जिंतूर आगारात इंधन बचाव मासिक कार्यक्रम संपन्न

आधुनिक केसरी न्यूज



**जिंतूर :** येथील बस स्थानक आगारात इंधन बचाव मासिक कार्यक्रम घेण्यात आला.सदरील कार्यक्रमास कार्यक्रमाचे अध्यक्ष बसस्थानक प्रमुख मो.मा.वाटुरे तर कार्यक्रमाचे अध्यक्ष सुरक्षा व दक्षता अधिकारी काळबांडे तर प्रमुख पाहुणे म्हणून सहाय्यक कार्यशाळा अधीक्षक पोळ तर आगार प्रमुख जवळेकर, वाहतूक निरीक्षक चिभडे, वाहतूक नियंत्रक संदीप भांबळे,हेड मेकॅनिकील पंडित, सह पत्रकार संघाचे अध्यक्ष शेख शकील,माजिद भाई, ग्राहक मंचाचे गुलाबराव शिंदे, प्रवासी महासंघाचे तालुकाध्क्ष सचिन रायपत्रीवार पत्रकार महेश देशमुख आदींची उपस्थिती आहे. या वेळी कालबांडे व शेख शकील यांनी इंधन बचाव या विषयी मोलाचे मार्गदर्शन करत इंधन लिपिक,सहायक हेड मेकॅनिकल आदींनी समन्वय साधून वाहनाचे कॅपिटल कसे जास्त राहील व इंधन जास्तीत जास्त प्रमानात कसे वाचवता येईल या बाबत सखोल माहिती दिली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन लिपिक गुणीरत्न वाकोडे तर आभार मदन मुंढे यांनी केले.

# प्राणप्रतिष्ठा सोहळ्याला भाजपचा इव्हेंट म्हणणे भक्तांची चेष्टा

आधुनिक केसरी न्यूज

**अंबाजोगाई :** उद्याच्या 22 रोजी आयोध्येत




रामलल्ला प्राणप्रतिष्ठापना सोहळा म्हणजे मागच्या वर्षानुवर्षापासुन समस्त हिंदु धर्मातील भारतवासियांनी पाहिलेले स्वप्न साकार होणं असुन तो दिवस म्हणजे दुसयांदा दिवाळी वर्षात साजरी करण्याचा योग म्हणावा लागेल. मात्र या सोहळ्याला देश आणि राज्य पातळीवर काँग्रेसवाले भाजपचा इव्हेंट म्हणत असतील तर तो देशातील तमाम हिंदु धर्म रामभक्ताचा अपमान असल्याची टिका भाजपाचे राज्य प्रवक्ते राम कुलकर्णी यांनी केली. राम मंदिर सोहळा इव्हेंट नसुन तो कार्यक्रम श्रद्धा आणि भक्तीचा सोहळा असल्याचे प्रतिपादन भाजपाचे राज्य प्रवक्ते राम कुलकर्णी यांनी करत काँग्रेस राज्य प्रभारी रमेश चेन्नीथला यांना उत्तर दिले.

प्रसिद्धीसाठी काढलेल्या पत्रकात त्यांनी म्हटले आहे की, लोकसभा निवडणुकीच्या तयारीसाठी प्रदेश काँग्रेस पक्षाची अमरावतीमध्ये बैठक झाली त्यात पक्षाचे प्रदेश प्रभारी रमेश चेनीथला यांनी भाजपवर आरोप करताना राजकिय फायदा उठवण्यासाठी मंदिर उद्घाटन इव्हेंट केला जात असल्याचे सांगितले. त्याला उत्तर देताना कुलकर्णी यांनी पत्रकात म्हटले आहे की, मुळातच काँग्रेस पक्षाच्या मताच्या लाचारीमुळे प्रभु रामचंद्र मंदिर बांधकामाचा प्रश्न वर्षानुवर्षे रेंगाळत पडला. पुरातन काळात चौदा वर्षे वनवास भोगणाया रामाला कलियुगात देखील काँग्रेसनं ऊन, पाऊस, वारा यासारख्या संकटात टाकताना तंबुत कोंडुन ठेवले. कारण स्वातंत्र्यानंतर देशात आणि राज्यात काँग्रेसी व्यवस्था होती. मुळातच प्रभु रामचंद्र जन्माला आलेच नाहीत?या आविर्भावातच काँग्रेसवाल्यांनी नेहमीच या प्रश्नावर विरोध केला. पक्षाचे नेते मणिशंकर अय्यर, दिग्विजयसिंह, रामराजे यांनी तर शब्द छळ करून केवळ राजकिय पोळ्या भाजण्यासाठी अधुनमधुन आयोध्या तीर्थक्षेत्राचा छळ केल्याचा आरोपही त्यांनी केला. काल अमरावतीत प्रभारी रमेश चेनिथला यांनी काँग्रेसच्या बैठकीत ज्ञान पाजळताना राजकिय फायदा उठविण्यासाठी प्राणप्रतिष्ठा सोहळा भाजप करत असल्याचा आरोप लावला. खरं तर काँग्रेस नेत्यांनी प्राणप्रतिष्ठा सोहळ्यावर अशा प्रकारचा आरोप लावणे म्हणजे देशातील हिंदु धर्माची चेष्टा आणि समस्त राम भक्तांच्या हदयी भावनेचा अपमान करणे होय. राक्षस कुळातील अशी माणसं ज्यांच्या सद्गुणात अपप्रवृत्ती घुसलेली असते ज्यामुळे नको त्या शंका देवाधिकांच्या बाबतीत घेतात.अशा प्रकारचा अनुभव कलियुगात येत असला तरी धर्मयुगात देखील याच प्रवृत्तीची मंडळी होती. ज्यांनी सीतामाईवर गलिच्छ आरोप करत अग्निपरीक्षा द्यायला लावली होती. मंदिर बांधकामाबाबत बोलण्याचा मुळात काँग्रेसवाल्यांना बोलण्याचा अधिकारच नाही तरी देखील त्यांची वायफळ बडबड ज्यातुन नास्तिक प्रदर्शनाचे दर्शन झाल्याशिवाय रहात नाही. भाजपाला राजकिय फायद्यासाठी मंदिर इव्हेंट करायची गरज नाही. कारण प्रभु रामचंद्र मंदिर बांधकाम पुर्ण करण्यासाठीच देशाच्या राजकिय व्यवस्थेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा जन्म झाला असल्याचे सांगत तुम्ही जेवढ्या रामाला शिव्या घालताल तेवढा शाप तुम्हाला लागल्याशिवाय रहाणार नाही. काँग्रेस पक्षाची नाव आता समुद्रात बुडत असुन देश जोडण्याची भाषा नेते करत असले तरी काँग्रेस अंतर्गत मतभेदामुळेच संपुष्टात येत असल्याचा दावा त्यांनी केला. भारत जोडो पेक्षा काँग्रेस तोडो म्हणुनच महाराष्ट्रात देखील अनेक काँग्रेस नेते पक्षाला सोडुन जात असल्याची टिका कुलकर्णी यांनी पत्राद्वारे केली.

## प्रथमेश दुधगावकर भारतीय जनता युवा मोर्चा महाराष्ट्र प्रदेश कार्यकारीणी सदस्यपदी

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** देशाचे पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांच्या



विचाराने प्रेरित होऊन राज्याचे लोकप्रिय नेते उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, भाजपा महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष श्री चंद्रशेखरजी बावनकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली यांची भारतीय जनता युवा मोर्चा महाराष्ट्र कार्यकारिणीत नियुक्ती झाली आहे. भारतीय जनता युवा मोर्चा महाराष्ट्र प्रदेश पदाधिकारी म्हणून आपण भारतीय जनता पक्षाला ताकद मिळवुन देण्यासह पक्षाची ध्येय धोरणे विचार तथा पक्षाचे काम तळागळातील सर्व सामान्य व्यक्तीपर्यंत पोहोचविण्याचे काम कराल अशी अपेक्षा भाजपाच्या कार्यकारिणीने व्यक्त केली. याबद्दल सर्वत्र त्यांचे अभिनंदन होत आहे.

## बाबासाहेब शेळके यांची शासनाने स्वच्छतादूत म्हणून निवड करावी

### अंबड तालुक्यातील 27 ग्रामपंचायतची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**जालना :** अंबड तालुक्यातील डोमेगाव ग्रामपंचायतचे पाणी पुरवठा कर्मचारी बाबासाहेब शेळके यांनी स्वच्छ भारत अभियानात केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल त्यांची राज्य शासनाने स्वछतादूत म्हणून निवड करण्याबाबत शिफारस करण्याची मागणी अंबड तालुक्यातील 27 ग्रामपंचायतीसह डोमेगांवच्या ग्रामस्थांनी अंबड तहसीलदार यांच्याकडे केली आहे. अंबड तहसीलदारांना याबाबत दिनांक 16 जानेवारी रोजी निवेदन देण्यात आले आहे. या निवेदनात म्हटले आहे की, अंबड तालुक्यातील डोमेगांव येथील ग्रामपंचायतचे पाणी पुरवठा कर्मचारी बाबासाहेब राधाकिसन शेळके तसेच त्यांच्या पत्नी सौ. सविता बाबासाहेब शेळके यांनी डोमेगांव येथे स्वच्छ भारत अभियानामध्ये स्वच्छ भारत मिशन अंतर्गत उत्कृष्ट काम केले आहे. त्यांनी स्वतःची शेती विकून, पत्नीचे



दागिने विकून तसेच काही कर्ज काढून स्वखर्चाने डोमेगांव येथे शौचालय बांधून दिले. त्याप्रमाणे त्यांनी गावात घरासमोर तसेच शाळा, ग्रामपंचायत परीसरात वृक्ष लागवडीचा कार्यक्रमही राबविला आहे. झाडे वाचवण्यासाठी पाणीटंचाई निर्माण झाली असता स्वखर्चाने बोअर घेवून त्यांनी झाडे वाचविली. एक व्यक्ती एक झाड असा उपकम राबवून वृक्षदिंडी काढून सर्वांना झाडाचे महत्व पटवून दिले. तसेच गावातील अवैधरित्या दारु विक्री बंद करुन दारुबंदी व्यसनमुक्ती हा कार्यक्रम प्रभावीपणे राबविला आहे. शासनाच्या प्रत्येक राष्ट्रीय कार्यक्रमात बाबासोब शेळके यांनी उल्लेखनीय काम केलेले आहे.वृक्ष लागवड व वृक्ष संगोपन कार्यक्रमात त्यांनी केलेले काम लक्षात घेवून शासनाकडून तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत राज्यपालांच्या हस्ते "वनश्री" पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले आहे. बाबासाहेब शेळके यांचे स्वच्छते संदर्भातील काम लक्षात घेवून त्यांची स्वच्छतादूत म्हणून निवड करून ग्रामविकास मंत्री यांच्या हस्ते विशेष बाब म्हणून त्यांचा सपत्निक गौरव करणे बाबतचा प्रस्ताव ग्रामीण विकास मंत्रालयाकडे सादर करण्यासाठी जिल्हाधिकारी जालना यांच्याकडे शिफारसीसाठी सादर करावा, अशी मागणी या निवेदनात करण्यात आली आहे. अंबड तालुक्यातील 27 ग्रामपंचायतीसह मंत्री महोदय, आमदार व काही सामाजिक संस्थाच्या शिफारसींची पत्रेही या निवेदनासोबत जोडण्यात आली आहेत

गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

## 33 केव्ही असून अडचण नसून खोळंबा

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** तालुक्यातील इटोली हे डोंगराळ भागातील मोठे गाव आहे. या गावांच्या आजूबाजूस डोंगराळ भाग असून या परिसरातील मुख्य व्यवसाय शेती हा असल्याने शेतीसाठी वीज हा महत्त्वाचा घटक असून या ठिकाणी 33 केव्ही उपकेंद्र मोठ्या दिमाखात उभे आहे.

याच उपकेंद्रात कर्मचारी नियुक्त असून त्या ठिकाणी इंजिनिअर ,लाईनमन व स्टाफ हा जिंतूर तालुक्याच्या ठिकाणी राहत असल्याने शेतकऱ्यांना लाईन स्टॉप वेळेवर उपलब्ध नसल्याने परेशानींचा सामना करावा लागत असतो असाच प्रकार मागील पंधरा दिवसांपूर्वी 33 केव्ही कंत्राटी कामगारावर जीवावर बेतल्यांची वेळ आली होती.

या भागातील कोणत्याही डीपीवर काम करावयाचे झाल्यास इंजिनिअर, लाईन हे जिंतूर ,बोरी सारख्या 20 ते 25 कि.मी. अंतरावर राहत असल्याने त्यासाठी ते 33 के.व्ही वरून काम करण्यासाठी विजप्रवाह खंडित करावयाचा झाल्यास येथील लाईनमन महाशय घरूनच परमिट देण्याची परवानगी देतात. मागील गेल्या 04 जानेवारी 2024 रोजी गुरुवार दुपारी 2:30 वाजता कंत्राटी कामगार श्रीपाद बन्शीधर राठोड राहणार गडदगव्हाण तांडा यास विजेचा शॉक लागल्यांची घटना घडली असल्याची माहीती येथील सरपंच घुगे यांनी सांगितले या बाबीकडे वरिष्ठांनी लक्ष देऊन कायमस्वरूपी 33 के व्ही ला अधिकारी व कर्मचाऱ्यांनी हेडकॉर्टरला राहून आपले कर्तव्य पार पाडावे अशी मागणी इटोली येथील सरपंच जगदीश घुगे व गावकऱ्यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना केली.

